सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## आघाडीत होणार बिघाडी? उद्धव ठाकरेंना काँग्रेस देणार मोठा झटका, राजकीय वर्तुळात चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला असला, तरीही वरवर महाविकास आघाडी टिकून आहे. मात्र, विधान परिषदेमधील विरोधी पक्षनेते पदावरून काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्यात मतभेद होण्याची शक्यता आहे. सध्या उद्धव ठाकरे गटाचे अंबादास दानवे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते आहेत, परंतु त्यांची मुदत येत्या ऑगस्टमध्ये संपणार आहे.



विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते पदासाठी काँग्रेसने दावा सांगण्याची तयारी सुरू केली आहे. सध्या काँग्रेसकडे विधान परिषदेत सर्वाधिक आठ सदस्य आहेत, तर ठाकरे गटाकडे सात आणि शरद पवार गटाकडे दोन सदस्य आहेत. त्यामुळे संख्याबळाच्या आधारे काँग्रेसने हे पद मागितले आहे.

विधानसभेत महाविकास आघाडीतील सर्वाधिक आमदार शिवसेना (उद्धव ठाकरे गट) कडे आहेत. ठाकरे गटाचे २०, काँग्रेसचे १६ आणि शरद पवार गटाचे १० आमदार आहेत. त्यामुळे विधानसभेचे विरोधी पक्षनेते पद उद्धव ठाकरेंच्या पक्षाला मिळू शकते, असा अंदाज आहे. जर विधानसभेत ठाकरे गटाला विरोधी पक्षनेते पद मिळाले, तर विधान परिषदेमध्ये काँग्रेसने हे पद मागणे स्वाभाविक असल्याचा काँग्रेसचा युक्तिवाद आहे.

**आघाडीत तणाव वाढणार?**

विरोधी पक्षनेते पदावरून ठाकरे गट आणि काँग्रेसमध्ये चर्चेचे सत्र सुरू असल्याची माहिती मिळत आहे. यावर अंतिम निर्णय अजून झालेला नाही. मात्र, काँग्रेसने ठाम भूमिका घेतल्यास महाविकास आघाडीतील तणाव वाढू शकतो.

## दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपावरून तीन सरकारी कर्मचारी बडतर्फ

### उपराज्यपाल मनोज सिन्हा यांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सातत्याने दहशतवादी हल्ल्याच्या घटना समोर येत आहेत. भारतीय लष्कर आणि दहशतवाद्यांमध्ये अनेकवेळा चकमकीच्या घटनाही घडल्या आहेत. सरकार देखील दहशतवाद्याच्या विरोधात कठोर पावलं उचलत आहे. या पार्श्वभूमीवर आज जम्मू-काश्मीरचे लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी एक मोठी कारवाई केली आहे. दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याच्या संशयावरून तीन



सरकारी कर्मचाऱ्यांना थेट बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

दरम्यान, लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांनी कारवाई केलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये एक पोलीस हवालदार, एक वन विभागाचा कर्मचारी आणि एका शिक्षकाचा समावेश असल्याची ओळख पटली आहे. या तीन कर्मचाऱ्यांचा दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचा आरोप आहे. त्यावरून त्यांच्यावर बडतर्फ करण्यात आलं आहे. तीन कर्मचाऱ्यांपैकी एकाचं नाव फिरदौस अहमद भट असं असल्याची माहिती समोर आली आहे. तो सेवेत असताना एका दहशतवादी संघटनेसाठी काम करत असल्याचा आरोप आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.आज लेफ्टनंट गव्हर्नर मनोज सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्वाची बैठक पार पडली. या बैठकीत सुरक्षा आढावा घेण्यात आला. यानंतर तीन तीन कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याची कारवाई करण्यात आली. या बैठकीत मनोज सिन्हा यांनी पोलीस आणि सुरक्षा यंत्रणांना दहशतवादविरोधी कारवाया आणखी तीव्र करण्याचे आदेश देखील दिले. जम्मू-काश्मीरमध्ये गेल्या काही वर्षांत दहशतवादी गटांना पाठिंबा दिल्याबद्दल ७० हून अधिक सरकारी कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्यात आलेलं आहे.

## अरविंद केजरीवालांच्या अडचणी वाढणार?

### 'शीशमहाल'ची सखोल चौकशी होणार, सीव्हीसीचे आदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नवी दिल्ली**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत आपला पराभवाचा सामना करावा लागला. यानंतर आता दिल्लीचे माजी मुख्यमंत्री आणि आपचे प्रमुख अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. अरविंद केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री असताना 'शीशमहाल' म्हणून उल्लेख होत असलेला बंगला त्यांचे अधिकृत शासकीय निवासस्थान होते. या बंगल्यावरून आता नवा वाद उफाळून आला आहे.

केंद्रीय दक्षता आयोगाने अरविंद केजरीवाल यांच्या बंगल्याची सखोल चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.



सीव्हीसीच्या म्हणण्यानुसार, अरविंद केजरीवाल यांनी सर्व नियमांचे उल्लंघन करून आठ एकरमध्ये ४०,००० चौरस यार्ड जमिनीवर बंगला बांधला. आता सीपीडब्ल्यूडी या प्रकरणाची सविस्तर चौकशी करणार आहे. त्यामुळे अरविंद केजरीवाल यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. याप्रकरणी अद्याप अरविंद केजरीवाल यांनी कोणतीही प्रतिक्रिया दिलेली नाही.

दरम्यान, गेल्या वर्षीच भाजप नेते विजेंद्र गुप्ता यांनी सीव्हीसीला पत्र लिहून या बंगल्याची चौकशी करण्याची मागणी केली होती. बंगल्याच्या नूतनीकरण आणि बांधकामात सर्व नियमांचे उल्लंघन झाल्याचे विजेंद्र गुप्ता यांनी म्हटले होते. तसेच, भाजपने निवडणूक काळात बंगल्याची पुनर्बांधणी करताना अरविंद केजरीवाल यांनी आसपासच्या सरकारी जमिनीवर अतिक्रमण केल्याचा गंभीर आरोपही केला होता. तसेच, अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपद सोडल्यानंतर हा बंगला रिकामी केला. त्यानंतर झथऊ ने बंगल्याच्या सामानांची यादी प्रसिद्ध केली. ती यादी माध्यमांसह सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली होती.

## माझ्या क्षमतेप्रमाणे काम करण्याची संधी मिळाली नाही

### उबाठाचे आमदार भास्कर जाधव यांनीही व्यक्त केली नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते राजन साळवी यांनी पक्षाच्या उपनेतेपदाचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला. राजन साळवी हे पक्ष सोडणार असल्याची चर्चा गेल्या काही दिवसांपासून होती. यामुळे उद्धव ठाकरे यांनी त्यांची समजूत देखील घातली होती. त्यानंतर साळवींनी शिंदे गटात प्रवेश केला. साळवींच्या पक्षप्रवेशाने ठाकरे गटाला कोकणात मोठा धक्का बसला. अशातच आता कोकणातील एकमेव आमदार भास्कर जाधव




यांनीही नाराजी व्यक्त केली आहे. कार्यक्षमतेप्रमाणे काम करण्याची संधी न मिळाल्याचे दुर्दैव असल्याचे भास्कर जाधव यांनी म्हटलं.

ठाकरे गटाचे राजापूर-लांजाचे माजी आमदार राजन साळवी यांनी उपनेतेपदाचा राजीनामा देत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. राजन साळवी यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह ठाण्यात एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत पुन्हा धनुष्यबाण हाती घेतला. मात्र आता कोकणातील ठाकरे गटाचे एकमेक आमदार भास्कर जाधव हे देखील नाराज असल्याचे म्हटलं जात आहे. टीव्ही९ ला दिलेल्या मुलाखतीमध्ये भास्कर जाधव यांनी खंत बोलून दाखवली.

महाराष्ट्रात मला मानणारा वर्ग आहे. महाराष्ट्रात मी लोकांशी बोलतो, संवाद साधतो. यात नाटकीपणा नसतो, लबाडी नसते, खोटं बोललेलं मला आवडत नाही. महाराष्ट्रातील लोकांना हे भावतं. पण माझं दुर्दैवं मला सतत आडवं आलं आहे. मला माझ्या क्षमतेप्रमाणे काम करण्याची संधी मिळू शकली नाही, अशी कबुली भास्कर जाधव यांनी दिली.माझी राजकारणातील सुरुवात होती तेव्हा बाळासाहेब ठाकरे यांच्यासमोर मला भाषणं करायची संधी मिळाली. त्यावेळी शिबिरांत मला भाषणं करण्याची संधी मिळायची. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशींना बाळासाहेब ठाकरे म्हणाले होते की या पोराला महाराष्ट्रात फिरवा याला महाराष्ट्रात फिरवला तर ग्रामीण भागातील, तळागाळातील माणूस आपल्याला जोडला जाईल. शिवसेना प्रमुखांचे हे आशीर्वाद लाभले. त्यानंतर पवारांचे आशीर्वाद लाभले, असंही भास्कर जाधव म्हणाले.

## न्यू इंडिया बँक घोटाळा प्रकरणी माजी जनरल मॅनेजरला अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १५ मुंबई**

न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँक घोटाळा प्रकरणात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. बँकेचा माजी महाव्यवस्थापक हितेश मेहताला अटक करण्यात आलेली आहे. हितेश मेहताची आर्थिक गुन्हे शाखेकडून चौकशी केली जाणार आहे. १२२ कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप मेहतावर आहे. या प्रकरणी बँकेच्या कर्मचाऱ्यांनीच पोलीस ठाण्यात तक्रार दिली. त्यानंतर मेहताविरोधात गुन्हा नोंदवण्यात आला. आता मेहताला अटक करण्यात आलेली आहे. घोटाळा प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवण्यात आलेला आहे.

न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँकेचा माजी महाव्यवस्थापक हितेश प्रवीणचंद मेहतानं बँकेच्या प्रभादेवी (दादर) आणि गोरेगाव शाखांच्या कोषागारातून १२२ कोटी रुपये काढले. त्याच्या कार्यकाळात या शाखांची जबाबदारी त्याच्याकडे होती. हा घोटाळा २०२० ते २०२५ या कालावधीत झाला. तशी नोंद पोलीस तक्रारीत आहे. 'रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांसमोर मेहतानं अपहाराची कबुली दिली होती.

## विधानसभा निवडणुकीनंतर अमित शाह पहिल्यांदाच पुणे दौऱ्यावर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५पुणे**

विधानसभा निवडणुकीनंतर आता सर्वच पक्षांनी आपला मोर्चा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीकडे वळवला आहे. यासाठी स्थानिक नेत्यांना पक्ष संघटनेचं काम जोमाने करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत.

यासाठी पक्षाचे सदस्त वाढवण्यासाठी नवीन सदस्य नोंदणी सुरू करण्यात आली आहे. अशातच आता पुण्यात भाजपकडून पुण्यात केंद्रीय गृहमंत्री अमित शाह (-ाळीं डहरह) यांचा कार्यक्रम व्हावा, यासाठी फिल्डिंग लावली जात आहे. शहांच्या कार्यक्रमामुळे शहरातील कार्यकर्त्यांना बळ येऊ शकतं. तसंच आगामी निवडणुकांवर देखील त्याचा



परिणाम होऊ शकतो.

पुण्यात केंद्रीय गृह विभागाची पश्चिम विभागीय बैठक २२ फेब्रुवारीला पार पडणार आहे. या बैठकीला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा पुणे दौऱ्यावर येणार आहेत. यासाठी जिल्हा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. मात्र, यावेळी त्यांचा राजकीय कार्यक्रम होणार की नाही हे निश्चित झालेलं नाही. मात्र, त्यांचा कार्यक्रम व्हावा यासाठी भाजपकडून जोरदार प्रयत्न सुरू आहेत.

कोरेगाव पार्क येथील पंचतारांकित हॉटेलमध्ये होणाऱ्या पश्चिम विभागीय बैठकीचे अध्यक्ष शहा असणार आहेत. यात महाराष्ट्र, गुजरात, गोवा, दादरा आणि नगर हवेली, दमण दीव येथील अधिकारी उपस्थित राहणार आहेत. तसंच या दिवशी गणेश कला क्रीडा मंच येथे सहकार विभागाचा कार्यक्रम होणार आहे.

## फडणवीस म्हणाले- महाराष्ट्राचा तुरुंग तहव्वूर राणासाठी तयार

### कसाबला ठेवले त्यात त्याची काय बाब; अमेरिकेने प्रत्यार्पणाला दिली मान्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५मुंबई**

मुंबई हल्ल्याचा सूत्रधार तहव्वुर राणा याला ठेवण्यासाठी राज्यातील तुरुंग पूर्णपणे सुरक्षित असल्याचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे. ते म्हणाले की जर आपण अजमल कसाबला ठेवले असेल तर त्यात काय मोठी गोष्ट आहे. राणालाही तुरुंगात ठेवता येईल.

त्यांनी सांगितले की, राणाला भारतात आणण्यासाठी यापूर्वीही प्रयत्न करण्यात आले होते. भारताने ऑनलाइन चौकशी केली आणि अमेरिकेला सर्व संबंधित पुरावे दिले. पण अमेरिका त्याला पाठवायला तयार नव्हती. आता पंतप्रधान मोदींच्या पुढाकारानंतर अमेरिकेने सहमती दर्शवली आहे.

२५ जानेवारी रोजी, अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने भारत-अमेरिका प्रत्यार्पण करारांतर्गत राणाच्या



प्रत्यार्पणाला मान्यता दिली. तहव्वुर राणा यांना २००९ मध्ये एफबीआयने अटक केली होती. पाकिस्तानी वंशाचा कॅनेडियन नागरिक राणा सध्या लॉस एंजेलिसच्या डिटेंशन सेंटरमध्ये आहे.

१३ फेब्रुवारी रोजी, पंतप्रधान मोदींनी त्यांच्या अमेरिका दौऱ्यादरम्यान वॉशिंग्टनमध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची भेट घेतली. ट्रम्प यांनी दहशतवादी तहव्वुर राणाच्या प्रत्यार्पणाबद्दलही वक्तव्य केले होते. लवकरच राणाला अमेरिकेतून भारतात आणले जाईल.

तहव्वुर राणा भारतात परतल्यानंतर मुंबई हल्ल्यातील शहीदांना खरी श्रद्धांजली मिळेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. पंतप्रधान मोदी यांच्यामुळे कुख्यात राणाला अमेरिकेने भारताच्या ताब्यात दिले आहे.त्यांनी सांगितले की ही एक महत्त्वाची बाब आहे. देशातील जनता बऱ्याच काळापासून याची वाट पाहत होती. देशाची दीर्घ प्रतीक्षा संपली आहे. मुंबई हल्ल्याच्या सूत्रधाराला आता शिक्षा होणार आहे. यामुळे मुंबई हल्ल्यांना न्याय मिळेल.

## माझ्याविरोधात षडयंत्र रचलं, लवकरच पर्दाफाश करणार; सुरेस धस यांचा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१५बीड**

भाजप आमदार सुरेश धस यांनी राष्ट्रवादीचे नेते आणि मंत्री धनंजय मुंडे यांची दोनदा भेट घेतल्याने वादंग निर्माण झालं आहे. कारण हेच सुरेश धस मागील काही आठवड्यांपासून कथित भ्रष्टाचारासह विविध मुद्द्यांवरून धनंजय मुंडे यांना लक्ष्य करत होते. मात्र आपल्या भेटीबाबत दिशाभूल करण्यात आली असून सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून लक्ष विचलित करण्यासाठी हे षडयंत्र रचण्यात आल्याचा आरोप आमदार धस यांनी केला आहे.




सुरेश धस यांनी म्हटलं आहे की, धनंजय मुंडे यांच्याशी माझी दोनदा भेट झाली. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी मला जेवणासाठी निमंत्रित केलं होतं. बावनकुळे यांनी तिथं मुंडेंनाही बोलावलं होतं. तिथं आमच्यात अर्धा तास चर्चा झाली. मात्र संतोष देशमुख हत्या प्रकरणात मी कसलीही तडजोड करणार नाही, हे मी तेव्हा स्पष्ट सांगितलं होतं. त्यानंतर आता दोन दिवसांपूर्वी मीच धनंजय मुंडे यांच्या निवासस्थानी त्यांना भेटायला गेलो होतो. कारण डोळ्याचं ऑपरेशन झाल्याने माणुकसकीच्या नात्याने मी भेटायला गेलो. त्यांनी माणुसकी सोडली असली तरी आम्ही माणुसकी दाखवली. पण या भेटीची बातमी मुद्दाम लीक करून माझ्याविरोधात षडयंत्र रचण्यात आलं आहे. हे षडयंत्र कोणी रचलं, याचीही मला माहिती आहे. पुढील एक-दोन दिवसांत ते नाव समोर येईल, असा इशारा धस यांनी दिला आहे.

## संपादकीय ......

# दूर गेलेले गाव

आपले आयुष्य चांगले जावे, यासाठी प्रत्येकाची धडपड असते. चांगल्या आयुष्याच्या शोधामध्ये लोक स्थलांतर करत असतात. ग्रामीण भागातील लोक शहरात येतात. शहरातील लोक महानगरात जातात. ही प्रक्रिया सातत्याने होत आलेली आहे. शहरांची गावातील लोकांना सामावून घेण्याची क्षमता संपली की, शहरे बकाल होतात. आज कोकणातील परिस्थिती पाहिली, तर असे सांगितले जाते की, कामासाठी माणसे नाहीत आणि माणसांना काम नाही. अशीच परिस्थिती शहरांमध्ये असते आणि तशीच परिस्थिती ग्रामीण भागातील खेड्यांमध्ये असते. गावातील लोक शहरांमध्ये येऊन फार काही भव्य–दिव्य काम करतील, अशी काही शक्यता नसते. हे लोक कुठे मॉलमध्ये, कोणत्या दुकानात किंवा एखाद्या इमारतीचे काम करत असतात. काही एक कौशल्य प्राप्त असेल, तर ते इलेक्ट्रिशन किंवा प्लंबर म्हणून आपला उदरनिर्वाह करत सहज राहतात.

मुंबईपुरते पाहायला गेले, तर उत्तर प्रदेशी भय्या लोकांनी यायला सुरुवात केली आणि पाणीपुरीचे गाडे, लहान मुलांसाठीचे फुगे किंवा काय वाटेल ते घेऊन हे लोक दिवसभर विक्री करत फिरायला लागले. पुढे या लोकांनी भाज्या विकायला सुरुवात केली, फळे विकायला सुरुवात केली आणि हळूहळू आपले बस्तान बसविण्यास सुरुवात केली. ही सगळी जगण्यासाठी धडपड करणारी माणसे ग्रामीण भागातून शहराकडे येत असतात. एका प्रांतामधून दुसर्या प्रांतामध्ये येत असतात. शहरामध्ये रमलेला जीव पुन्हा गावाकडे जायला तयार नसतो आणि मग गावेच्या गावे ओस पडतात. गावांमध्ये फक्त म्हातारी आणि वयस्कर लोकं असतात. ते आपली कशीबशी शेती आणि इतर गोष्टी सांभाळत गुजराण करत असतात. शहरात रमलेले लोक सणावाराला आवर्जून गावाकडे जातात आणि गावाकडे ती मजा राहिली नाही, असे सांगत बसतात. कारण, त्यांनी लहानपणी पाहिलेली मजा आता खरंच गावात राहिलेली नसते. स्थलांतर करून लोक इतर शहरांमध्ये किंवा किमान जिल्ह्याच्या ठिकाणी गेलेले असतात आणि मग आपले ते लोक नाही दिसले की, या शहरातून आलेल्या माणसाला करमत नाही. हळूहळू त्याचे गावाकडे जाणे कमी होते. कारण, त्याचे सगळे नातेवाईक यथावकाश शहरामध्ये आलेले असतात.प्रत्येकाचे एक भावविश्व असते आणि ते भावविश्व त्याच्याबरोबरच संपत असते. स्थलांतर करून पोटापाण्याचा प्रश्न सुटतो; परंतु मानसिकतेचा सुटेल, याची काही खात्री नसते.भारत या देशाची गंमत अशी आहे की, लोक कुठूनही कुठेही गेले, तरी आपली संस्कृती सोबत घेऊन जातात आणि त्या संस्कृतीच्या खाणाखुणा शहरांमध्ये दिसायला लागतात. मुंबईमध्ये छटपूजा नावाचा उत्तर भारतीय लोकांचा सण फार मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. पतीचे आयुष्य वाढावे म्हणून उत्तर भारतीयांचे पाहून मराठी महिलासुद्धा चाळणीतला चंद्र पाहायला सुरुवात करतात. रंगपंचमी, होळी इत्यादी सणांवर सर्व प्रांतांचे आक्रमण झालेले दिसते. मंडळी, ही विविधतेतून एकता हीच आपल्या भारताची ओळख आहे आणि स्थलांतरित लोक ही ओळख आणखी मजबूत करत आहेत, याचा आनंद व्यक्त केल्याशिवाय राहवत नाही.

## यंदा उन्हाळा लवकर!

# मार्चमध्येच जाणवणार उष्णतेच्या लाटा, IMD चा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महाराष्ट्रातील फेब्रुवारी महिना अधिकाधिक उष्ण होत असून, गेल्या १२१ वर्षात या महिन्यातील कमाल तापमान ०.७४ अंश सेल्सिअसने, तर किमान तापमान ०.४४ अंश सेल्सिअसने वाढल्याचे निरीक्षण हवामानतज्ज्ञांनी नोंदवले आहे. भारतीय हवामान विभागाच्या (खचऊ) आकडेवारीनुसार १९०१ ते २०२२ दरम्यान फेब्रुवारी महिन्यातील तापमान स्थिरपणे वाढत आहे. यावर्षीही हा कल कायम राहण्याची शक्यता असून, महिन्याच्या अखेरीस राज्यातील तापमान ४० अंशापर्यंत पोहोचण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हिवाळ्याची चाहूल आता जानेवारीपुरतीच मर्यादित राहिली आहे. पूर्वी मार्चअखेरपर्यंत थंडी जाणवत असे, मात्र गेल्या काही वर्षांपासून फेब्रुवारी महिन्यातच तापमान मोठ्या प्रमाणावर वाढू लागले आहे. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात थंडी ओसरते आणि फेब्रुवारीच्या मध्यापासून तापमान झपाट्याने वाढत जाते. यंदाही हीच स्थिती असून, सध्या राज्यातील तापमान ३६ ते ३८ अंशांपर्यंत पोहोचले आहे. पुणे, नागपूर, अकोला



आणि परभणीसारख्या जिल्ह्यांमध्ये उष्णतेची तीव्रता अधिक जाणवत आहे. याशिवाय, फेब्रुवारी महिन्याती पर्जन्यमानही घटत असल्याचे हवामान अभ्यासकांचे निरीक्षण आहे. मागील काही दशकांमध्ये या महिन्यात पाऊस कमी होत गेला असून, यंदाही राज्यात फेब्रुवारीत पावसाची शक्यता नाही. परिणामी, उष्णतेच्या लाटेचा प्रभाव अधिक तीव्र जाणवेल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.गेल्या काही वर्षांपासून तापमानवाढ आणि हवामानातील बदलांचा प्रभाव महाराष्ट्रावर स्पष्टपणे दिसून येत आहे. फेब्रुवारी महिन्यातील वाढत्या उष्णतेमुळे उन्हाळ्याची सुरुवात लवकर होत असल्याचे संकेत मिळत आहेत. त्यामुळे नागरिकांनी योग्य ती काळजी घेण्याचा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

# खारपानपट्टा शेती क्षेत्र उत्पादन वाढीसाठी उपाययोजना करू.–

## शेतकरी परिसंवादात उमेश ढोणे यांचे मागणीवर कृषिमंत्री ना.कोकाटे यांचे उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती–** आज कृषी मंत्री ड, माणिकराव कोकाटे यांचे अध्क्षतेखालील शेतकरी परिसंवाद विभागीय बैठक जिल्हा नियोजन सभागृह अमरावती येथे आयोजित केली होती.त्या बैठकीत आमदार रवी राणा यांचे युवा स्वाभिमान पार्टी चे कार्यालय सचिव यांनी व खारपाणपट्टा मधिल शेतकरी म्हणून बोलतांना त्यांनी अमरावती जिल्ह्यातील भातकुली ,दर्यापूर व इतर काही तालुक्यांतील शेती क्षेत्र खारपानपट्टा मध्ये येत असल्याने या ठिकाणचे शेतकऱ्यांचे उत्पादन



वाढीसाठी तज्ञांकडून वेगळी योजना आखावी –धोरण राबवावे अशी समस्या मांडली यावर कृषिमंत्री यांनी मागणी ची दखल घेत शासन स्तरावर कृषी विद्यापीठ व तज्ञांकडून अहवाल घेऊन शासनाकडून उपाययोजना करू असे सविस्तर मत व्यक्त केले. कृषी ची शेततळे हि योजना अल्प भूधारक शेतकऱ्यांना परवडत नाही दुसरे असे कि तळ्यावर वन्य प्राणी पाणी पिण्यासाठी येऊन शेतातील पिके खावून टाकतात. व या क्षेत्रात तांत्रिक अडचणी मुळे ईतर योजना चा लाभ घेणें शक्य नाही , सोबत सोबत दुसऱ्या योजना आखली जावी.यावर हि शासन तज्ञांचे मत घेतं आहेः असे हि ना.कोकाटे बोलले.

वेळेअभावी सर्वच बोलता न आल्याने लेखी स्वरूपात निवेदनातून पोकरा –१ मधील शेतकऱ्यांना अल्पसा लाभ मिळाल्याने त्या गावांचा समावेश पोकरा –२ मध्ये करावा व जेणेकरून शेतकरयांना लाभ मिळेल हा विषय वर्डबँक शी संबधीत आहेः असे सांगितलें.कृषी योजना, शेतकऱ्यांसाठी लाभ, उत्पादनवाढीच्या योजना संबंधी लेखी निवेदन यावेळी ना . ड,माणिकराव कोकाटे यांना युवा स्वाभिमान पार्टीच्या वतीने ढोणे यांनी दिले यावेळी युवा स्वाभिमान पार्टी चे कार्यकर्ते उपस्थित होते.

# तुमची सिंचन मोटार सुद्धा वारंवार जळते का? मग 'हे' उपाय करा आणि मोटारचे आयुष्य वाढवा

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक १**

विजेवर चालणाऱ्या मोटारी दोन प्रकारच्या असतात. ए.सी. व डी.सी महाराष्ट्रात खेडेगावांत व शेतातून ए.सी. पद्धतीचा वीज पुरवठा असल्यामुळे ए.सी. मोटारीच वापरल्या जातात. एका यंत्राला ज्यावेळी एकाच तारेतून वीज पुरवठा केला जातो, तेव्हा त्याला सिंगल फेज व तीन तारांतून केला जातो तेव्हा त्याला थ्रीफेज म्हणतात.

लहान कामासाठी एक अश्वशक्ती हॉर्सपॉवर किंवा त्यापेक्षा कमी शक्तीच्या मोटारींना एक फेजमधून पुरवठा करतात. परंतू जास्त शक्तीच्या यंत्रांना तीन तारांतुन पुरवठा करतात. ए.सी. मोटारी सुरु होतात तेंव्हा सुमारे चौपट विद्युत प्रवाह घेण्याचा प्रयत्न करतात. हे टाळण्यासाठी स्टार्टर वापरतात.

मोटारीची निवड करतांना लक्षात घ्यावयाच्या गोष्टी

१. मोटारीची किंमत

२. करावयाच्या कामाचे स्वरुपानुसार योग्य अश्वशक्तीची मोटार घ्यावी.

३. दर मिनिटास किती फे–यांची आवश्यकता आहे, पंपाचे, गिरणीचे, चाकाचे फेरे, आरपीएम, लक्षात घेवून ठरवावे.

४. मोटार बसवावयाची जागा ही पाण्याजवळ अथवा धूळ व कचरा अडणारी असेल तर पूर्ण झाकलेली मोटार घ्यावी.

मोटार जळणे

(मोटार तापून तिच्या वेटोळ्यातील तारेवरचा पापुद्रा जाळून वेटोळे काळे पडले की मोटार जळाली असे म्हणतात. मोटार खालील कारणांमुळे जळण्याचा संभव असतो.)

१. कमी अश्वशक्तीच्या मोटारीवर त्यापेक्षा जास्त काम करुन घेण्याचा प्रयत्न केल्यास तारेचे वेटोळे हे जास्त विद्युत प्रवाह घेण्याचा प्रयत्न करते.

२. मोटारीवरील तारेचे वेटोळे पाण्यात बुडणे किंवा ओले होणे.







३. उंदीर, पाली, झुरळे, लहान बेडूक मोटारीत शिरल्या, त्यांचा विद्युत वाहक भागाशी स्पर्श झाल्यास तारांमधील विद्युत प्रवाह अनियमित होवून मोटार जळते.

४. मोटारीतील धूळ, कचरा जास्त असल्यास ती तापते व जळू शकते.

५. मोटारीतील रोटर व स्टार्टर एकमेकांवर घासले गेल्यास मोटार जळते.

वारंवार होणारी बिघाड टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी

१. मोटारीवर पाणी उडू देऊ नये. मोटार सुरु करण्यापूर्वी ती मध्ये पाणी शिरलेले नाही याची खात्री करुन घ्यावी.




२. मोटारीत कचरा, धूळ, कीटक, पाली, उंदरी वैगरे शिरु नयेत म्हणून तिला झाकण घालावे.

३. मोटारीचे फाउन्डेशन समपातळीत करावे, बेअरिंगला वेळच्या वेळी ग्रीस व वंगण तेल द्यावे.

४. कमी शक्तीच्या मोटारीकडून जास्त शक्तीचे काम घेणे टाळावे.

५. इतर वस्तूंचा टेकु लावून मोटार चालवू नये.

६. मोटार सतत चालवू नये. तिला अधून मधून विश्रांती द्यावी.

७. मोटार जळाल्यास खात्रीच्या ठिकाणाहून रिवाईंडींग करुन घ्यावी.

विजेपासून अपाय होऊ नये म्हणून घ्यावयाची काळजी

१. कोरडया लाकडी फळीवर उभे राहून काम करावे.

२. फयुज तारा बसवितांना रबरी हातमोजे वापरावे.

३. मोटारीचे काम करण्यासाठी सर्व फ्यूज काढुन विजपुरवठा बंद करावा.

४. मोटार चालू असतांना मोटारीच्या कोणत्याही भागाला हात लावू नये.

५. काम संपल्यानंतर मेन स्विच बंद करावा.




## कोलेस्ट्रॉलमुळे बंद झालेल्या नसा क्षणार्धात होतील साफ, फक्त सकाळी उठून प्या 'हा' ज्युस

**दि.१५विदर्भ प्रजासत्ताक**

जेव्हा शरीरात कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढते, तेव्हा नसा ब्लॉक व्हायला सुरुवात होते. त्यालाच एथेरोस्क्लेरोसिस म्हंटले जाते. त्याने शरीराला मोठ्या प्रमाणात धोका होतो, तसेच त्रास सुद्धा सहन करावा लागतो. त्यासाठी तुम्ही पुढे दिलेल्या माहितीनुसार तुमच्या आहारात किंवा सेवनात काही आवश्यक बदल करू शकता. त्याने तुम्हाला कोलेस्ट्रॉलमुळे होणारा त्रास घरगुती आणि आयुर्वेदिक पद्धतीने नष्ट होईल.



कोलेस्ट्रॉल हा एक प्रकारचा चरबीसदृश पदार्थ (लिपिड) आहे जो शरीरासाठी आवश्यक असतो. तो पेशींच्या संरचनेत, संप्रेरक (हार्मोन्स) तयार करण्यात आणि जीवनसत्त्व ऊतयार करण्यात मदत करतो. परंतु, शरीरात कोलेस्टेरॉलची पातळी जास्त झाल्यास हृदयविकाराचा धोका वाढू शकतो.

कोलेस्ट्रॉलचा धोका टाळण्यासाठी उपाय

कोलेस्ट्रॉलचा धोका टाळण्यासाठी तुम्ही ग्रीन टी, ओट ड्रिंक्स आणि प्लांट मिल्क स्मुदीचे सेवन करू शकता. त्यात तुमच्या आवडीच्या ड्रिंकचे सेवन तुम्ही करू शकता. या ड्रिंक्समध्ये असणारी संयुगे तुमचा कोलेस्ट्रॉल लेवल कमी करू शकतात.तुम्ही रोजच्या आहारात आवळा आणि गाजराच्या ज्युसचे सेवन करू शकता. आवळा आणि गाजर आपल्या शरीरासाठी खूप फायदेशीर ठरू शकतो. हे दोन्ही पदार्थ आपल्या पोटासाठी खूप फायदेशीर ठरू शकतात. आवळ्या मध्ये व्हिटॅमिन ल चे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे आवळ्याचे सेवन केल्याने कोलेस्ट्रॉल आपल्या कंट्रोलमध्ये राहू शकते. तर गाजरामध्ये सुद्धा भरपूर प्रमाणात बीटा – कॅरोटीन असतात. त्याने आपल्या नसांमध्ये असणारी घाण साफ होते. त्यासाठी तुम्ही रोजच्या आहारात या पदार्थांचे सेवन करणे महत्वाचे आहे.

**आवळा आणि गाजराचे सेवन कसे करावे?** कोलेस्ट्रॉलचा धोका टाळण्यासाठी २ आवळे, थोडे पाणी, १ चमचा मध आणि स्वच्छ असलेले गाजर घ्या. आता आवळा आणि गाजर बारिक कापून घ्या आणि मिक्सरमध्ये बारिक करून घ्या. त्यात थोडे आवश्यकतेनुसार पाणी मिक्स करा. आता तयार ज्युस तुम्ही मधासोबत सकाळी उठल्यावर सेवन करू शकता. किमान १५ दिवस या पाण्याचे सेवन केल्याने तुम्हाला बद्धकोष्ठतेपासून सुद्धा आराम मिळू शकतो.

# विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांच्याकडून विमानतळाची पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अकोला–** विभागीय आयुक्त श्वेता सिंघल यांनी आज अकोला येथील शिवणी विमानतळ व डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाला भेट देऊन पाहणी केली.

जिल्ह्याच्या विमानतळ विकासासाठी लोकप्रतिनिधींकडून शासनाकडे पाठपुरावा होत आहे. त्या अनुषंगाने विमानतळ येथे सद्य:स्थितीत उपलब्ध सुविधा व आवश्यकता याबाबत आढावा विभागीय आयुक्तांनी घेतला.

उपविभागीय अधिकारी डॉ. शरद जावळे यावेळी उपस्थित होते.

विमानतळ येथील धावपट्टी, इमारत, कार्यालय, स्वच्छतागृहे, वाहनतळ आदी अनेक सुविधांची पाहणी व विमानतळ अधिकारी–कर्मचा–यांशी चर्चा करून विविध विषयांचा आढावा विभागीय आयुक्तांनी यावेळी घेतला. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठालाही श्रीमती सिंघल यांनी भेट घेऊन तेथील हॉर्टिकल्चर व विविध प्रकल्पांची पाहणी केली. त्यांनी यावेळी संशोधक–तज्ज्ञांशी चर्चा करून तेथील कृषी प्रात्यक्षिकांची पाहणी केली. विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.






RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक


शनिवार दि. १५ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण



# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची सहकुटुंब कुंभमेळ्यात हजेरी

## त्रिवेणी संगमात केले पवित्र स्नान...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५प्रयागराज**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज आपल्या कुटुंबासह प्रयागराजमध्ये आयोजित पवित्र महाकुंभात स्नान केले. यावेळी पत्नी अमृता फडणवीस आणि मुलगी दिविजा सोबत होत्या. स्नानानंतर मुख्यमंत्री फडणवीसांनी पत्रकारांशी संवाद साधताना महाकुंभातील व्यवस्थेबद्दल योगी सरकारचे कौतुक केले. तसेच, या महाकुंभात आल्याचा खूप आनंद असल्याचे म्हटले.





मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, १४४ वर्षांनंतर हा महाकुंभाचा योग आला. मी माझ्या कुटुंबासह महाकुंभला येऊ शकलो, याचा मला खूप आनंद आहे. लोक आनंदी आहेत. कोट्यवधी भाविकांनी गंगेत डुबकी मारून नवा इतिहास आणि विक्रम रचला. मी यूपी सरकार आणि सीएम योगी यांचे अभिनंदन करतो. त्यांनी अतिशय सुंदर व्यवस्था केली आहे, अशी प्रतक्रिया फडणवीसांनी दिली. तसेच, त्यांनी २०२७ साली नाशिकमध्ये होणाऱ्या कुंभाची तयारी सुरू केल्याचेही सांगितले.

यावेळी अमृता फडणवीस म्हणाल्या, 'मला इथे येऊन खूप छान वाटले. हा एक आनंद देणारा अनोखा अनुभव आहे. पुढील कुंभ नाशिक येथे होणार आहे, त्यासाठी खूप उत्साही आहे. लोक विश्वासाने येतात, त्यामुळे त्यांच्यासाठी चांगली व्यवस्था असायला हवी. आम्ही त्यांना एक सुंदर अनुभव देण्याचा प्रयत्न करणार आहोत, अशी प्रतिक्रिया त्यांनी यावेळी दिली.

### महाकुंभात 'महारेकॉर्ड'

प्रयागराजच्या भूमीत १३ जानेवारीपासून महाकुंभ २०२५ सुरू झाला. आत्तापर्यंत ५० कोटींहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमात पवित्र स्नान करून इतिहास रचला आहे. जगात फक्त भारत आणि चीनची लोकसंख्या येथे येणाऱ्या भाविकांपेक्षा जास्त आहे. मौनी अमावस्येला सर्वाधिक ८ कोटी भाविकांनी स्नान केले, तर मकर संक्रांतीच्या दिवशी ३.५ कोटी भाविकांनी अमृत स्नान केले. महाकुंभ आणि महत्त्वाच्या स्नान महोत्सवाला अजून १२ दिवस बाकी आहेत. त्यामुळे स्नान करणाऱ्या भाविकांची संख्या ५५ ते ६० कोटींच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.

# देशाचे गृहमंत्री अमितभाई शहा यांचा शंकरबाबाना थेट फोन

## दिल्यात वाढदिवसाच्या खास शुभेच्छा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती :**२रस्त्याच्या कडेला सोडून दिलेल्या बेवारस, दिव्यांग मुलांना पितृछत्र देऊन त्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्यभर धडपड करणारे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते शंकरबाबा पापळकर यांचा वाढदिवस एरवी अत्यंत साधेपणाने वझ्झर येथील अंबादासपंत वैद्य दिव्यांग, बेवारस बालगृहात साजरा केला जातो. पण, त्यांचा ८४ वा वाढदिवस खास होणार होता. बालगृहातील मुले-मुली आपल्या बाबांच्या वाढदिवसाच्या तयारीत गुंतलेले असताना सकाळी देशाचे गृहमंत्री अमित शहा यांचा शंकरबाबांना फोन आला. अमित शहा यांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. दोघांमध्ये सुमारे अर्धा तास चर्चा झाली. बेवारस, दिव्यांग मुला-मुलींच्या पुनवर्सनाचा कायदा व्हावा, या मागणीचा पुनरूच्चार शंकरबाबा यांनी चर्चेदरम्यान केला, त्यावर निश्चितपणे हा कायदा केला जाईल, असे आश्वासन अमित शहा यांनी दिले.

आज सकाळी वझ्झर येथील बालगृहात १२३ मुला-मुलींच्या उपस्थितीत शंकरबाबा यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी बालगृहातील मुला-मुलींनी त्यांचे औक्षण केले. त्यांचे आशीर्वाद घेतले. याआधी गृहमंत्री अमित शहा यांच्या स्वीय सहायकांनी शंकरबाबा यांच्याशी फोनवर संपर्क साधला. अमित शहा हे आपल्याशी बोलू इच्छितात असे, त्यांनी सांगितल्यानंतर शंकरबाबा यांच्यासाठी हा सुखद धक्का होता. ८४ व्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतानाच गृहमंत्र्यांनी त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. सुमारे अर्धा तास दोघांमध्ये चर्चा झाली.



देशाच्या गृहमंत्र्यांनी आपल्या वाढदिवसाची आठवण ठेवावी आणि संवाद साधावा, हा एक आनंदाचा क्षण असल्याचे शंकरबाबा पापळकर म्हणाले. अचलपूर तालुक्यातील वझ्झर येथील स्व. अंबादासपंत वैद्य दिव्यांग, बेवारस बालगृहाच्या माध्यमातून त्यांचे कार्य अविश्रांतपणे सुरू आहे. शंकरबाबांच्या बालगृहात राज्याच्या विविध जिल्ह्यांमधून बेवारस दिव्यांग मुले आजीवन पुनर्वसनासाठी दाखल होत असतात. या ठिकाणच्या १२३ मुला-मुलींच्या नावापुढे शंकरबाबा पापळकर यांचे नाव लागते. या सर्व मुला-मुलींचे ते पिता आहेत. या मुलांच्या शिक्षणापासून ते त्यांच्यावरील उपचार आणि त्यांचे विवाह लावून देण्याची जबाबदारी देखील शंकरबाबा यांनीच सांभाळली. आजवर ३० मुला-मुलींचे लग्न करून देताना त्यांच्या योग्य पुनर्वसनाचे यशस्वी 'प्रारूप' शंकरबाबा यांनी तयार केले आहे. १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुलांना बालगृहात ठेवता येत नाही, असा नियम आहे. परंतु अपंग, मतिमंद, दृष्टिहीन मुले व मुली कुठे जाणार, असा सवाल करून या मुलांच्या पुनर्वसनासाठी सरकारने कायदा करावा, अशी शंकरबाबांची मागणी आहे.

# तोतया कर्मचारी आढळल्यानंतर मनपा प्रशासन जागे

**मनपाच्या सर्व कर्मचाऱ्यांचे आयकार्ड व्हेरीफाय होणार**
**मनपा आयुक्तांचे सर्व विभाग प्रमुखांना कठोर निर्देश**
**कंत्राटी कर्मचाऱ्यांना संबंधित कंपनीचे ओळखपत्र राहणार**

### आयकार्डचे व्हेरीफिकेशन

या धक्कादायक प्रकरणानंतर मनपा प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली होती. अशा प्रकाराला आळा बसावा म्हणून मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सर्व विभाग प्रमुखांना मनपा आस्थापनावरील आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र जमा करून त्याचे व्हेरीफिकेशन करण्याचे आदेश दिले आहे. विशेष म्हणजे जे कंत्राटी कर्मचारी आहेत. त्यांचे ओळखपत्रावर ते ज्या संबंधित कंपनीकडून कामावर आहेत, त्याचा उल्लेख आता त्यांच्या ओळखपत्रावर राहणार आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१५अमरावती,** एक दोन नव्हे तर चक्क दोन वर्षापासून बिनधास्तपणे गळ्यात ओळखपत्र ठेवून खुलेआम ड्युटी करणाऱ्या एका तोतया कनिष्ठ लिपिकाचा मनपात गुरुवारला भंडाफोड झाला होता. या प्रकरणी मनपाने तक्रार दाखल केल्यानंतर तोतया कर्मचारी ओम पांडुरंग पाटील यास ताब्यात घेतले होते.



त्यानंतर त्याला ओळखपत्र बनवून देणाऱ्याची विचारपूस केली होती. आता या प्रकरणी सिटी कोतवाली पोलिसांनी मनपाच्या तक्र ारीनुसार या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तर दुसरीकडे अशा प्रकारला आळा बसावा म्हणून मनपाच्या सर्व विभागात आस्थापनावर असलेले आणि कंत्राटी कर्मचाऱ्यांचे ओळखपत्र व्हेरीफाय करण्याचे आदेश मनपा आयुक्त सचिन कलंत्रे यांनी सर्वविभाग प्रमुखांना दिलेत.

गुरुवार १३ फेब्रुवारीला उपायुक्त-२ व अतिरीक्त आयुक्त-१ यांनी बांधकाम विभाग येथे सकाळी ११.३० वाजता ओम पांडुरंगपाटील = (३०, छांगानी नगर) या तोतया कर्मचाऱ्यास बांधकाम विभागातून ताब्यात घेतले होते.त्यानंतर त्याला सिटी कोतवाली पोलिसांनी त्याला ताब्यात घेवून सिटी कोतवाली पोलिस स्टेशनला नेले होते.

तेथे त्याने ओळखपत्र बनवून देणाऱ्याचे नाव सांगितल्यानंतर संबंधिताची चौकशी केली. तपासाअंती सिटी कोतवाली पोलिसांनी आरोपी ओम पाटील आणि ओखळपत्र बनवून देणाऱ्या दोघांविरुद्ध कलम २०४,२०५,३ (५) बीएमएस अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

# मोर्शीत दोन अवैध सावकारांच्या घरावर धाडी

## सहाय्यक निबंधक विभागाच्या पथकाची कारवाई, ३६ कोरे धनादेशासह अन्य दस्तावेज ताब्यातकोरे स्टॅम्प पेपर, ईसार पावती, नोंदवही जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५मोर्शी** मोर्शी येथील सहाय्यक निबंधक कार्यालया तील दोन पथकांनी एकाचवेळी दोन अवैध सावकारांच्या घरी धाड टाकल्याने सहकार क्षेत्रात चांगलीच खळबळ उडाली आहे. यापैकी एका सावाकाराच्या घरातून स्वाक्षरी असलेले तब्बल ३६ कोरे धनादेश मिळाले. तसेच कोरे स्टॅम्प पेपर, ईसार पावती व नोंदवही देखील मिळून आली.



सुनील रामकृष्ण निंभोरकर, रा. पार्डी, ता. मोर्शी, सुधीर महादेवराव पाचारे रा. दुर्गानगर, मोर्शी अशी धाड पडलेल्या दोन अवैध सावकारांची नावे आहेत. माहितीनुसार सुनील निंभोरकर वसुधीर पचारे यांच्या विरोधात अवैध सावकारीच्या अनेक तक्रारी सहकारी संस्थांचे जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांच्या कडे आल्या. त्यामुळे कुंभार यांनी मोर्शी येथील सहाय्यक निबंधक राजेश भुयार व आशिष चर्जन यांच्या नेतृत्वात दोन स्वतंत्र पथके गठीत करून १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजून १५ मिनिटांनी एकाचवेळी निंभोरकर व पचारे यांच्या घरी पोलिस बंदोबस्तात धाड टाकली. सहाय्यक निंबधक राजेश भार यांनी सुधीर पाचारे याच्या घरी धाड टाकली .सुनिल निंभोरकर यांच्या घरातून पथकाने कर्जदाराचे स्वाक्षरी असलेले परंतु, रक्कम व तारीख नसलेले तब्बल ३६ धनादेश, कोरेस्टॅम्प पेपर, ६ ईसार पावती, नोंदवही जप्त करण्यात आल्या. दोन्ही सावकारांच्या घरातून मिळालेल्या दस्ताऐवजाची तपासणी करण्यात येत आहे.

# येवदा येथील सरपंच अपात्रच, उपसरपंचाकडे पदभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५येवदा -** ग्रामपंचायतच्या सरपंच प्रतिभा राजेंद्र माकोडे यांना विभागीय आयुक्तांच्या आदेशानुसार २२ जानेवारीला सरपंच पदावरून अपात्र घोषित केले होते. परंतु न्यायालयाच्या उच्च निर्णयानुसार अपात्र घोषित झाल्यापासून त्यांना तीन आठवड्याची मुदतवाढ मिळाली होती. त्यांची ही मुदत १२ फेब्रुवारीला संपल्याने ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमानुल्ला खा दिलावर खा यांना सरपंच पदाचा प्रभार सोपविला आहे.येवदा ग्रामपंचायतच्या गावठाणातील सरकारी जमिनीचा गैरव्यवहार, पदाचा गैरवापर आणि प्रशासकीय आदेशांच्या उल्लंघनाचा ठपका माजी सरपंच बतिभा माकोडे यांच्यावर डेवण्यात आला होता. शिवसेनेचे (ठाकरे गट) प्रदीप वडतकर आणि ग्रामपंचायत सदस्य सुयोग टोबरे यांनी यासंदर्भात विभागीय आयुक्त कार्यालयात तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत असा आरोप करण्यात आला की, ग्रामपंचायतीच्या मालकीच्या सरकारी जमिनीचे बेकायदेशीर हस्तांतरण करण्यात आले. ग्रामपंचायतीच्या नियमांचे उल्लंघन करून या जागेचा नमुना ८-अ तयार करून जमिनीचा ताबा नोंद खासगी संस्थेकडे सुपूर्द करण्यात आला. तसेच या व्यवहारात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप करण्यात आला होता.




यासंदर्भात सादर केलेल्या पुराव्यांच्या आधारे महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम ३९ (१) अंतर्गत प्रतिभा माकोडे यांना सरपंच आणि सदस्य पदासाठी अपात्र घोषित करण्यात आले. त्याचप्रमाणे सरपंच प्रतिभामाकोडे यांनी २६ जानेवारी २०२४ ची ग्रामसभा नियमानुसार न घेतल्याने सरपंच यांच्या विरोधात अमरावती जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयामध्ये प्रदीप वडतकर यांनी अपील दाखल केली होती. सदर प्रकरणात अर्जदार प्रदीप वडतकर यांची बाजू ॲड. अरविंद गुडघे यांनी मांडली.दरम्यान उपसरपंच अमानुल्ला खा दिलावर खा यांनी सरपंच पदाचा प्रभार स्वीकारला. यावेळी प्रदीप वडतकर, बाळासाहेब राऊत, देविदास कोकाटे, बाळासाहेब वडतकर, सुयोग टोबरे, मुजम्मिल जमादार, अनंत राऊत, संतोष तिडके, पंकज कैकाडी, शाम ठाकरे, विलास कैसर यांच्यासह असंख्य नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक सचिव अरुण रायबोले तर प्रभारी सरपंच अमानुल्ला खा यांनी आभार व्यक्त केले.

# अध्यक्ष किरण पातुरकर, सचिव आशिष सावजी यांनी सांभाळला पदभार

## एमआयडीसी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांचे पदग्रहण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती-** एम आय डी सी असोसिएशनच्या कार्यालयामध्ये एमआयडीसी असोसिएशनचे नवनियुक्त अध्यक्ष किरण पातुरकर व सचिव आशिष सावजी यांच्यासह अन्य पदाधिकाऱ्यांनी पदभार सांभाळला. नवीन कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये सर्वप्रथम सभेचे अध्यक्ष म्हणून किरण पातुरकर यांनी माजी उपाध्यक्ष व्दारकाप्रसाद भंसाली यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर २१ कार्यकारिणी सदस्यांमधून सर्वप्रथम अध्यक्ष पदावर किरण पातुरकर यांची, त्यानंतर उपाध्यक्ष म्हणून पुरुषोत्तम बजाज, सचिव पदी आशिष सावजी, सहसचिवपदी प्रकाश राठी यांची निवड करण्यात आली. पदग्रहण समारंभादरम्यान माजीउपाध्यक्षांनी एमआयडीसीमध्ये भाषणामध्ये पाणीपुरवठा, वैभव टाइल्स जवळील रस्ता, मिनी बायपासवरील असलेले एम.आय.डी. सी. ते फायर स्टेशनपर्यंतचे बंद पथदिवे इत्यादी समस्यांवर प्रकाश टाकला. एम. आय. डी. सी. इंडस्ट्रीयल असोसिएशन कार्यकारिणीमध्ये अनिल रामचंद्र माधोगढीया, दिलीपलक्ष्मीनारायण अग्रवाल डी.के. परेश जेठालाल राजा, कोषाध्यक्ष अशोक शामलाल अग्रवाल (गोयल), सचिव आशिष चंद्रशेखर सावजी, सहसचिव प्रकाश लक्ष्मीनाराय ण राठी, दिपक रोहतास अग्रवाल, जनसंपर्कपदी बंटी प्रेम जगमलाणी तसेच कार्यकारी सदस्यात कमलेश लक्ष्मीनाराय ण डागा,सह अन्य मान्यवर उपस्थित होते.



# डॉ. पंजाबराव देशमुख यांना भारतरत्न देण्याची डॉ. अनिल बोंडे यांची कृषिमंत्र्यांकडे मागणी

## केंद्राला पत्र लिहून पाठपुरावा करणार : ना. माणिकराव कोकाटे

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१५अमरावती**

'विर्भातील मागासलेपण दूर करून सर्वसामान्य घटकाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांचे कार्य उल्लेखनीय आहे. स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री असलेल्या डॉ. पंजाबराव देशमुख यांनी कृषी क्षेत्रात क्रांतीकारी बदल घडून आणलेत. त्यामुळे त्यांचा भारतरत्न देऊन सन्मान करावा, अशी मागणी खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी कृषी मंत्री ना. माणिकराव कोकाटे यांच्याकडे केली. कोकाटे यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत केंद्र सरकारला पत्र देऊन पाठपुरावा करणार असल्याचे आश्वासन डॉ.बोंडे यांना दिले.ॲड. माणिकराव कोकाटे अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना दरम्यान भाजप खासदार अनिल बोंडे यांनी कोकाटे यांची भेट घेत कृषी क्षेत्रातल्या विविध विषयावर संवाद साधला. गाव, तालुका, ग्रामीण क्षेत्रात असलेल्या महत्त्वपूर्ण गावांमध्ये कृषी भावनांची निर्मिती करावी. कृषी विभागाला चालना देण्यासाठी विभागातल्या रिक्त पदांचा बॅकलॉग भरून काढावा. कृषी सेवकाला सुसज्ज सुविधा शासनाने द्याव्या, जेणेकरून कृषी विभाग शेतकऱ्यांच्या दारी पोहोचेल, अशा मागण्या त्यांनी कृषी मंत्र्यांकडे उपस्थित केल्या.



# शेतकरी केंद्रबिंदू मानून नियोजन करण्यात येईल-कृषी मंत्री ॲड. माणिकराव कोकाटे



## प्रदर्शनात २८८ स्टॉल्स , ३८१ शेतकरी सहभागी

## विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉल्सची रंगत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

प्रत्येक भागातील जमीन वेगळी असल्यामुळे वेगवेगळी पीके घेण्यात येतात .यासाठी आपण घेत असलेल्या पिकांना अनुसरून पूरक व्यवसाय निवडणे गरजेचे आहे. शेती हा आपला कणा असून शेतकरी केंद्रबिंदू मानून कृषी नियोजन करण्यात येईल, असे प्रतिपादन कृषिमंत्री ड. माणिकराव कोकाटे यांनी आज येथे केले.

सायंन्सस्कोर मैदान येथे आजपासून सुरू झालेल्या कृषी विकास परिषद व प्रदर्शनीचे उद्घाटन कृषी मंत्री ड. श्री. कोकाटे यांच्या हस्ते करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुलभा खोडके, आमदार प्रवीण तायडे, आमदार राजेश वानखडे, कृषी आयुक्त सूरज मांढरे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, कृषी सह संचालक प्रमोद लव्हाळे, जिल्हा शेतकरी सल्लागार समितीचे अध्यक्ष नरेंद्र शिंगणे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राहुल सातपुते आदी उपस्थित होते.

कृषी मंत्री श्री.ड. कोकाटे म्हणाले, आपला देश कृषिप्रधान असल्यामुळे शेती आणि शेतकरी यांच्याशी प्रत्येकजण जुळलेला आहे. शेतीमध्ये मनुष्यबळाची कमतरता आहे. शेती निसर्गावर अवलंबून असल्यामुळे वातावरण बदलाच्या संकटाला सामोरे जावे लागते. अशावेळी पूरक व्यवसाय मदतनीस ठरतात. बाजारात भाव मिळत नसल्याने शेतकरी अस्थिर असतो. यासाठी शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून शेती उद्योगधंद्यांचे नियोजन करण्यात येईल. विद्यापीठातील पडित जमिनीवर चारा लागवड व्हावी. जेणेकडून जमीनही उपजाऊ राहील आणि शेतकऱ्यांना पशुसंवर्धनासाठी मदत होईल. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला . कृषी विकास परिषद व प्रदर्शनीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेतीविषयक माहिती मिळेल. याच धर्तीवर अन्य जिल्ह्यातही अशा स्वरूपाच्या प्रदर्शनीचे आयोजन करण्यात येईल. याबाबत शेतकऱ्यांच्या सूचना विचारात घेवू. तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली तरी शेतीमध्ये मनुष्यबळाला पर्याय नाही. नवीन एआय तंत्रज्ञानामुळे शेती अधिक फायदेशीर ठरावी, अधिक उत्पन्न अल्पावधीत घेता यावे यासाठी नवीन तंत्रज्ञान मदतनीस ठरेल. कृषी विद्यापीठामार्फत उत्कृष्ट वाण निर्मितीसाठी प्रयोग करण्यात यावे. शेतकरी खऱ्या अर्थाने समाधानी होण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्नशील आहे, असेही ते यावेळी म्हणाले.खासदार श्री. डॉ. बोंडे यांनी कृत्रिम बुद्धीमत्तेचा कृषी क्षेत्रात वापर महत्त्वपूर्ण असल्याचे सांगितले. नव तंत्रज्ञानामुळे कृषी क्षेत्रात सुलभता येणार आहे. शेतकऱ्यांनी उत्पादित मालावर प्रक्रिया करून बाजारात विक्री करण्याचे कौशल्य विकसित करण्यावर भर देण्यात येईल. या प्रदर्शनीतील सेंद्रिय शेतीच्या बाबतीतील प्रशिक्षण, संत्रा पीक व्यवस्थापन, ड्रोनच्या माध्यमातून सुरक्षित फवारणी, सेंद्रिय शेती व प्रमाणीकरण या विषयावरील मार्गदर्शन शेतकऱ्यांना सहाय्यभूत ठरेल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे -पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रगतिशील शेतकऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. संत्रा पीक व्यवस्थापन दिनदर्शिकेचे यावेळी प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी कृषी मंत्री श्री . ड. कोकाटे यांनी कृषी प्रदर्शनीतील विविध स्टॉल्सला भेटी देऊन स्टॉलधारकांशी संवाद साधला. येथे कृषी यंत्रे, अवजारे , धान्य, गृहपयोगी वस्त , मिलेट्स उत्पादने, बांबूच्या वस्तू, सिंचन साधने, कृषी निविष्ठा, सेंद्रिय धान्य, विविध शासकीय दालने, विविध खाद्यपदार्थ आदी स्टॉल्स लावण्यात आले आहेत. आत्मा प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी प्रास्ताविक केले.क्षिप्रा मानकर यांनी संचालन तर आभार राहुल सातपुते यांनी मानले.

**जिल्हास्तरावर कृषी मंत्री कक्ष स्थापणार–** शेतकऱ्यांना जाणवणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाययोजना, तसेच शेतकऱ्यांच्या वतीने येणाऱ्या सूचनांसाठी जिल्हास्तरावर कृषी मंत्री कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. या कक्षाला प्राप्त सूचना २४ तासाच्या आत मंत्रालयात कळविण्यात येईल, अशी माहिती कृषी मंत्री ड. माणिकराव कोकोटे यांनी दिली.

कृषी मंत्री ड. कोकाटे यांनी, शेतकऱ्यांच्या हितासाठी विभागीय स्तरावर समिती स्थापन करण्यात येणार आहे. या समितीचे अध्यक्ष कृषी मंत्री राहतील. समितीची तीन महिन्यातून एकदा बैठक घेण्यात येईल. यावेळी शिवारफेरीही काढण्यात येईल. अशा बैठकीतून जिल्ह्याचा डाटा तयार होणार असून राज्याचे धोरण ठरविण्यास उपयुक्त ठरणार आहे.

कृषी यांत्रिकीकरण आणि इतर निविष्ठांसाठी सध्या असणारी लॉटरी पद्धत बंद करण्यात येईल. यात सुटसूटीतपणा यावा, यासाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल. निवड झालेल्या शेतकऱ्यांना कागदपत्रे सादर करण्यास १५ दिवसांचा कालावधी दिला जाईल. तसेच डीबीटी योजना बंद होणार असून डीबीटीमधून बाद झालेल्या योजनाही पुन्हा डीबीटीमध्ये आणल्या जातील.

शेतपिकांच्या उत्पादन वाढीसाठी मल्चिंग पेपरचा उपयोग वाढविण्यात येणार आहे. यासाठी गुणवत्ता तपासून सर्व मल्चिंग पेपरला अनुदान देण्यासाठी सुधारणा करण्यात येतील. मल्चिंग पेपरचा दर्जा तपासण्यासाठी कृषी विभागाकडे तपासणी यंत्रे देण्यात येणार आहे. शेतीची उत्पादक वाढविण्यासाठी नवीन मंच तयार करण्यात येईल. यातून तज्ज्ञ आणि प्रयोगशील शेतकऱ्यांकडून शेतीबाबत मार्गदर्शन आणि सल्ला दिला जाईल. त्याबरोबरच कृषी विद्यापीठांनी संशोधनाला गती देऊन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रयोग यशस्वी करावेत, तसेच अद्यावत लॅब उभारावी.

किटकनाशकांचे दर ठरविण्यावर केंद्र आणि राज्य सरकारचे नियंत्रण नाही. याबाबत केंद्राकडे पाठपुरावा करण्यात येणार आहे. याबाबतीत केंद्र शासनाकडेप्रस्ताव पाठविण्यात येईल. ठिंबक सिंचनाचे राज्याचे अनुदान येत्या आठ दिवसात शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होणार आहे. याबाबत आधीच राज्यस्तरावर चर्चा करण्यात आली आहे. तसेच सफेद मुसळी उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन आधारीत कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. तसेच पिक विमा योजनेत सहभागी करून घेण्यात येईल. वन्य प्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी वन विभागाची मदत घेण्यात येणार आहे. शेतीला कुंपन घालण्यापेक्षा शेतकऱ्यांना उत्पादन देईल अशी कुंपन व्यवस्था करण्यात येईल. बांधावर बांबू, काटेसावर, करवंदाची लागवड करण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा. यामुळे कुंपनाच्या व्यवस्थेसाबतच पुरक उत्पन्नाची सोय होणार असल्याचे ड. कोकाटे यांनी सांगितले.यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार सुलभा खोडके यांनी मनोगत व्यक्त केले.

# महाराष्ट्रात नवे फौजदारी कायदे लागू करा

## गृहमंत्री अमित शाहांची राज्य सरकारला सूचना



विदर्भ प्रजासत्ताक

**दि.१५मुंबई,** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज नवी दिल्लीत महाराष्ट्रातील नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीसंदर्भात आढावा बैठक घेतली. या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. या बैठकीत राज्यातील पोलीस, कारागृहे, न्यायालये, अभियोजन आणि फॉरेन्सिक यासंबंधीच्या विविध नवीन तरतुदींच्या अंमलबजावणी चा आढावा घेण्यात आला.या बैठकीला केंद्रीय गृह सचिव, महाराष्ट्राचे मुख्य सचिव, महाराष्ट्राचे पोलिस महासंचालक, पोलीस संशोधन आणि विकास ब्युरो (इझठऊ) चे महासंचालक, राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (छउठइ) चे महासंचालक तसेच केंद्रीय गृह मंत्रालय आणि राज्य सरकारचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सांगितले की, मोदी सरकार देशातील नागरिकांना जलद आणि पारदर्शक न्यायव्यवस्था प्रदान करण्यास वचनबद्ध आहे. कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी गुन्ह्यांची नोंदणी होणे आवश्यक आहे आणि एफआयआर दाखल करण्यात कोणताही विलंब होता कामा नये.महाराष्ट्रात नवीन फौजदारी कायद्यांच्या धर्तीवर एक आदर्श अभियोजन संचालनालय प्रणाली विकसित करावी, असे त्यांनी सुचवले. तसेच, ७ वर्षांपेक्षा अधिक शिक्षेच्या गुन्ह्यांमध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त दोषसिद्धी दर मिळवण्यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले. पोलिस, सरकारी वकील आणि न्यायपालिका यांनी समन्वय साधून दोषींना शक्य तितक्या लवकर शिक्षा व्हावी, यासाठी प्रयत्न करावेत.गृहमंत्र्यांनी सांगितले की, संगठित गुन्हेगारी, दहशतवाद आणि जमावाकडून होणाऱ्या हिंसेच्या घटनांवर वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी नियमितपणे देखरेख ठेवली पाहिजे, जेणेकरून या तरतुदींचा गैरवापर होऊ नये. तसेच, कारागृहे, सरकारी रुग्णालये, बँका आणि फॉरेन्सिक सायन्स लॅबोरेटरी (ऋडङ) येथे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे पुरावे नोंदविण्याची प्रणाली विकसित करावी.गृहमंत्र्यांनी महाराष्ट्रला उउढछड २.० आणि खउगड २.० प्रणाली स्वीकारण्याचा सल्ला दिला आणि दोन वेगवेगळ्या राज्यांमध्ये एफआयआरचे हस्तांतर सहज करता यावे यासाठी उउढछड प्रणाली विकसित करावी, असे सुचवले.गृहमंत्र्यांनी असेही सांगितले की, पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची माहिती इलेक्ट्रॉनिक डॅशबोर्डवर उपलब्ध करून द्यावी. तसेच, राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटी सुधारण्याची आवश्यकता आहे.गृहमंत्र्यांनी असेही स्पष्ट केले की, प्रत्येक पोलीस उपविभागात फॉरेन्सिक सायन्स मोबाईल व्हॅन्स उपलब्ध असाव्यात आणि फॉरेन्सिक तज्ञांची भरती वेगाने करावी. यासाठी रिक्त पदे लवकरात लवकर भरली जावीत.महाराष्ट्र सरकारने राज्यातील फिंगरप्रिंट ओळख प्रणालीला 'राष्ट्रीय स्वयंचलित फिंगरप्रिंट ओळख प्रणाली शी जोडावे, असेही निर्देश गृहमंत्र्यांनी दिले. तसेच, नवीन फौजदारी कायद्यांतर्गत गुन्हेगारांकडून जप्त केलेली संपत्ती त्वरित मूळ मालकाकडे परत करण्यासाठी एक प्रभावी प्रणाली विकसित करण्याचे निर्देश दिले.गृहमंत्र्यांनी पोलीस ठाण्यांचे सौंदर्यीकरण आणि सुधारणांवर भर देण्याचे महत्त्वही अधोरेखित केले.गृहमंत्र्यांनी सांगितले की, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राज्यातील नवीन फौजदारी कायद्यांच्या अंमलबजावणीचा दर पंधरवड्याला एकदा आढावा घ्यावा, तर मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक यांनी आठवड्याला एकदा याचा आढावा घ्यावा.

# जमीन फ्री होल्ड करण्यासाठी मंगळवारपासून विशेष शिबिर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–** निवासी प्रयोजनार्थ लिलावाद्वारे प्रिमियम अथवा अन्यप्रकारे भाडेतत्वावर देण्यात आलेल्या जमीन फ्री होल्ड करण्यासाठी विशेष अभय योजना २०२४-२५ दि. ०१ एप्रिल २०२४ ते दि. ३१ जुलै २०२५ या कालावधीसाठी लागू करण्यात आली आहे. यासाठी अमरावती तहसील कार्यालयात मंगळवार, दि. १८ फेब्रुवारीपासून विशेष शिबीर आयोजित करण्यात आले आहे.अर्जदार नागरिकांनी त्यांचा अर्ज, मालमत्ता पत्रक पी-आर कार्ड, मुळ जागा मिळाल्याबाबतची कागदपत्रे, हक्कनोंदणी, सेटलमेंट, फेरफार, मुळ मालकाकडून व्यक्तींकडे सदर मालमत्ता हस्तांतरीत झाली असल्याबाबतची कागदपत्रे, खरेदीखत फेरफार, भाडेपट्टा नुतनीकरणाचे आदेश, शर्तभंग झाला असल्यास नियमानुकूल बाबतचे आदेश, जाहिरातनामा, चालू आर्थिक वर्षाचे मुल्यांकन, स्थळ निरीक्षण अहवाल आदी कागदपत्रे जोडुन अर्ज करावा लागणार आहे.यासाठी मंगळवार, दि. १८ फेब्रुवारी २०२५ ते दि. २५ फेबुवारी २०२५ पर्यंत तहसिल कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीमधील पहिल्या माळ्यावरील हॉलमध्ये विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपविभागीय अधिकारी अनिल भटकर यांनी केले आहे.

# भारतीय टपाल विभागात २१ हजार पदे भरली जाणार

## परीक्षा न देता मिळवा शासकीय नोकरी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१५अमरावती–** आपण जर नोकरीच्या शोधात असला तर कुठलीही परीक्षा न देता शासकीय नोकरीची संधी चालून आली आहे. आपण एक अर्ज करून आपल्या गुणवत्तेच्या जोरावर ही नोकरी मिळवू शकता. त्यासाठी दहावीमध्ये आपणाला किती गुण मिळाले हे महत्त्वाचे राहणार आहे. त्यामुळे ही बातमी सविस्तर वाचा आणि शासकीय नोकरी मिळवा. भारतीय टपाल विभागात मेगाभरतीसाठी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. या भरतीसाठी विविध पदांच्या तब्बल २१ हजार ४१३ रिक्त जागा भरण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुक आणि पात्र उमेदवार ३ मार्चपासून अर्ज भरू शकतात. भारतीय टपाल विभागाचे अधिकृत संकेतस्थळ ळपवळर्रींिसवीपश्रळपश.सीं.ळप वर अर्ज भरता येणार आहे. या भरती प्रक्रियेअंतर्गत पोस्टमन, ग्रामीण डाक सेवक (जीडीएस), मेल गार्ड, मल्टी टास्किंग स्टाफ (एमटीएस), सहाय्यक अधीक्षक ही पदे भरली जाणार आहेत.

या भरतीसाठी उमेदवारांनी मान्यताप्राप्त मंडळातून दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. तसेच दहावीमध्ये गणित आणि इंग्रजी विषय अनिवार्य असले पाहिजेत. याशिवाय, उमेदवारांना संगणक हाताळण्याचे ज्ञान असणे आवश्यक आहे. संगणक प्रशिक्षण प्रमाणपत्र आवश्यक आहे. या भरतीतील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे यातील निवड प्रक्रिया गुणवत्तेवर आधारित आहे., म्हणजेच त्यात कोणतीही लेखी परीक्षा होणार नाही. या भरती प्रक्रियेत




सहभागी होणाऱ्या उमेदवाराचे किमान १८ वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. तर कमाल वयोमर्यादा ४० वर्षापर्यंत असणे आवश्यक आहे. भरती नियमानुसार आरक्षित वर्गाला वयोमर्यादेत सूट देण्यात आली आहे. एससी/ एसटी उमेदवारांसाठी ५ वर्षांची सूट, ओबीसी उमेदवारांसाठी ३ वर्षांची सूट तर दिव्यांग उमेदवारांसाठी १० वर्षांची सूट देण्यात आली आहे. सामान्य/ ओबीसी/ ईडब्ल्यूएस उमेदवारांसाठी १०० रुपये अर्ज शुल्क आहे. तर एससी/एसटी/महिला/दिव्यांग उमेदवारांसाठी कोणताही अर्ज शुल्क नाही.

या भरतीसाठी अर्ज करणे सोपे आणि सरळ आहे.

-उमेदवारांना अधिकृत वेबसाइटला भेट देऊन अर्ज भरावा लागेल.

-निवड प्रक्रिया गुणवत्तेवर आधारित असल्याने, उमेदवारांची निवड त्यांच्या दहावीच्या गुणांच्या आधारे केली जाणार आहे.

-सदर उमेदवार ३ मार्च २०२५ पासून या भरती प्रक्रियेसाठी अर्ज करू शकणार आहेत.

-अर्ज करण्याची शेवटची तारीख २८ मार्च २०२५ निश्चित करण्यात आली आहे.

-अधिक तपशीलवार माहितीसाठी उमेदवारांनी अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.

# आठ महिन्यांपासून अवकाशात असलेल्या सुनीता विल्यम्स मार्चमध्ये पृथ्वीवर येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५वॉशिंग्टन : –**

तब्बल आठ महिन्यांपासून अवकाशात अडकून पडलेली भारतीय वंशाची अमेरिकी अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि तिचा सहकारी बूच विल्मोर १९ मार्चपर्यंत पृथ्वीवर परतणार आहेत. इलॉन मस्क यांच्या 'स्पेस एक्स'च्या ड्रॅगन कॅप्सूलमधून ते परततील.

केवळ आठ दिवसांच्या मोहिमेवर आंतरराष्ट्रीय अवकाश स्थानकावर रवाना झालेल्या सुनीता आणि बूच यांच्या परतीच्या मार्गात प्रचंड अडथळे आले, बोइंगच्या स्टारलायनर कॅप्सूलमधून गेल्या ५ जून रोजी स्थानकावर रवाना झालेले दोघे आठ महिन्यांपासून दोघे अवकाशात अडकून पडले आहेत. अमेरिकेचे नवे राष्ट्राध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारताच डोनाल्ड ट्रम्प यांनी इलॉन मस्क यांना या अंतराळवीरांना परत आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले होते.



या वातावरणात अवकाश यानाचा प्रवेश सर्वात जोखिमीचा. इथे सर्व काही सुरळीत पार पडले तर पॅराशूटच्या मदतीने उतरणाऱ्या कॅप्सूलमधून सुनीता व बूच सुरक्षित उतरतील.

..परतीची मोहीम

स्पेस एक्सच्या ड्रॅगन कॅप्सूल 'क्रू-१०'चा हा प्रवास अत्यंत जोखमेचा असेल. कारण यानाचा वेग असेल ताशी २८ हजार किमी तापमान निर्माण होईल सुमारे १५०० अंश. पृथ्वीकक्षेत प्रवेशानंतर याचा वेग कमी व्हायला प्रारंभ होईल. हे टप्पे नियोजितपणे पार पडले तर पॅराशूटने कॅप्सूल पृथ्वीवर उतरेल. परंतु, यात काही उणिवा राहिल्या तर मात्र ती सर्वात मोठी जोखीम ठरेल.

क्रू-१० : १२ मार्चला होणार रवाना

१२ मार्चला क्रू-१० यान ड्रॅगन कॅप्सूलसह लाँच होईल. अवकाश स्थानकावर नी मॅक्लेन, निकोल एअर्स, ताकुया ओनिशी आणि रोस्कोस्मोस या चौघांना सोडून सुनीता व बूच यांना घेऊन ते परतेल. क्रू घेऊन हे यान रवाना होईल. सुनीता विल्यम्स या मोहिमेत प्रयोगशाळेची कमांडर आहे. तिला आपला कार्यभार नवीन कमांडरकडे सोपवण्यास ५ ते ७ दिवस लागू शकतात. या दृष्टीने १९ मार्चपर्यंत ती पृथ्वीवर परतणे अपेक्षित आहे.

# महायुती सरकारने मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजनेत काम करणाऱ्या युवकांचा शासकीय सेवेत समावेश करावा

## शिवसेनेचे प्रकाश मारोटकर व प्रशिक्षणार्थ्यांची मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत काम करणाऱ्या प्रशिक्षणार्थी युवक युवतींना शासकीय सेवेत सामावून घेण्याची मागणी शिवसेनेचे प्रकाश मारोटकर व प्रशिक्षणार्थी युवकांनी जिल्हाधिकारी आमदार शिवसेना उपनेते नितीन देशमुख आमदार गजानन लवटे यांना निवेदन सादर करून केली

महायुतीचे तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील युवक युवतींना आवाहन करून राज्य पातळीवर युवकांना रोजगार देण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत सहभागी होण्याचे आवाहन केले होते सदर आवाहनाला प्रतिसाद देत राज्यातील युवक युवतींनी या योजनेत सहभागी झाले त्यांचा सहा महिन्यांचा कालावधी संपुष्टात आला असून या प्रशिक्षणार्थ्यांना शासकीय कामाचा अनुभव आला असून या योजनेच्या शासन निर्णयात नमूद नुसार प्रशक्षणार्थीची इच्छा असल्यास रोजगार देण्याच्या दृष्टीने संबंधित आस्थापना निर्णय घेऊ शकतील व प्रशिक्षण कालावधी जोडून नोकरी किंवा रोजगार देऊअसे नमूद होते व तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुद्धा तसे आश्वासित केले होते त्यामुळे या योजनेत सहभागी झालेल्या युवकांचा भविष्याचा विचार करून सर्व विभागातील या योजनेच्या प्रशिक्षणार्थ्यांना शासकीय योजनेत समाविष्ट करावा अश्या मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना सादर करून आमदार शिवसेना उपनेते नितीन देशमुख आमदार गजानन लवटे यांना अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा प्रश्न उपस्थित करावा अश्या मागणीचे निवेदन प्रशिक्षणार्थी विध्यार्थ्यांनि सादर केले यावेळी शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर गौरव काकडे अनिकेत आंबेकर श्रेयस प्रांजळे अनिकेत कुटेमाटे अजिंक्य संगोले मयूर वाठोडकर वैभव अलोने इत्यादी उपस्थित होते

# पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाची गरुड झेप

## पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकीतील २७ विद्यार्थ्यांची 'एपिटोम कॉम्पोनंट्स' मध्ये निवड : महाविद्यालयात कोअर क्षेत्रातील कंपन्यांचे कॅम्पस ड्राईव्ह चे आयोजन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५ अमरावती**

पी.आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील कोअर विभागात अंतिम वर्षाला शिकत असलेल्या २७ विद्यार्थ्यांची 'एपिटोम कॉम्पोनंट्स' या प्रतिष्ठित कंपनीत महाविद्यालयातील कॅम्पस प्लेसमेंटद्वारे निवड झाली आहे. 'एपिटोम कॉम्पोनंट्स' ही नामांकित कंपनी ऑटोमोबाईल आणि इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रातील प्रगत तंत्रज्ञानासाठी प्रसिद्ध असून, विद्यार्थ्यांना विविध महत्त्वाच्या विभागांमध्ये काम करण्याची संधी मिळाली आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग, आणि मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागांतील विद्यार्थ्यांचा समावेश आहे या निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये यज्ञेश बुंदेले, सोहम होले, सोनाली चव्हाण, ऐश्वर्या बाथे, अमृता पुंडकर, मेधांकर ठमके, दीप गहूकार, प्रणांगणी मांजरे, श्रुतिका पांडे, ऐश वर्मा, वृषाली जाधव, तेजस्विनी डोंगरे, श्रेयश क्षीरसागर, चैताली भोयर, वेदांत दिवाण, श्रुतिका कडू, मानसी गुल्हाने, सेजल बोराटने, समीक्षा हेंबाडे, ऋषिकेश खराड, जानवी भुटे, श्रावणी रोंदलकर, सई कावलकर, अभिषेक जयस्वाल, साक्षी राठोड, सुमित वाडीकर, आणि वेदिका पिंजरकर यांचा समावेश आहे.या यशाबद्दल विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाचे मार्गदर्शन, प्रकल्प आधारित शिक्षण, आणि उत्कृष्ट तांत्रिक प्रशिक्षणाला श्रेय दिले आहे. कंपनीच्या निवड प्रक्रियेतून यशस्वी होऊन, विद्यार्थ्यांनी 'एपिटोम कॉम्पोनंट्स'सोबत काम करण्याचा उत्साह व्यक्त केला आहे.निवड झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे संचालक डॉ पी.एम. खोडके, प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया, कॉर्पोरेट रिलेशन डीन प्रा. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, मेकॅनिकल विभागाचे विभाग प्रमुख डॉ. सोमदत्त तोंडरे, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभाग प्रमुख डॉ उमेश होरे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे विभाग प्रमुख डॉ. अपर्णा तेलंग तसेच मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. मनीष वालेचा, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. अनिकेत पावडे, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्लेसमेंट कोऑर्डिनेटर प्रा. सचिन जळीत यांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# अमरावतीत गुन्हे शाखेच्या युनिट क्र.१ कडून दोन घरफोडीचे गुन्हे उघड



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

शहरातील गाडगेनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीत झालेल्या दोन घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावत गुन्हे शाखा युनिट क्र. ०१ ने एकाला अटक केली आहे, तर एक आरोपी फरार आहे. १४ फेब्रुवारी २०२५ रोजी गाडगेनगर पोलीस ठाण्यात गजानन जनार्धन मस्के (रा. चांगापूर) यांच्या तक्रारीवरून गुन्हा क्रमांक १३५/२५, तसेच ऋषिकेश धनराज शर्मा (रा. चांगापूर) यांच्या तक्रारीवरून गुन्हा क्रमांक १४१/२५ नोंदवण्यात आला होता. गुन्हे शाखेच्या युनिट क्र. ०१ च्या पथकाने तपास करताना सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयित अभिषेक आनंदीलाल साहू (वय २२, रा. संतोषी नगर, अमरावती) याचा शोध घेतला. त्याला १४ फेब्रुवारी रोजी अटक करून चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. तसेच त्याने विशाल कराळे (रा. झाडपीपुरा, अमरावती) याच्या मदतीने घरफोडी केल्याचे सांगितले. विशाल कराळे सध्या फरार असून त्याचा शोध सुरू आहे.अटक आरोपी अभिषेक साहू याला पुढील तपासासाठी गाडगेनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.ही कारवाई पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, पोलीस उपआयुक्त कल्पना बारवकार, परिमंडळ क्र. ०१ चे उपआयुक्त सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे व अरुण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.तपास पथकात वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, सपोनि मनीष वाकोडे, पो.उपनि. प्रकाश झोपाटे, पो.ह. सतीश देशमुख, फिरोज खान, सचिन बहाळे, नाईक पोलीस नाझीमुद्दीन सैयद, विकास गुडदे, सचिन भोयर, सुरज चव्हाण, निखील गेडाम, चालक रोशन माहुरे व किशोर खेंगरे यांनी सहभाग घेतला.फरार आरोपी विशाल कराळेचा शोध सुरू असून लवकरच त्याला अटक करण्यात येईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.

# स्वरगुरूकुंज भजन मंडळाने पटकावले द्वितीय पारितोषिक

## गुरुकुंजच्या मानवसेवा छात्रालयाचे विद्यार्थी चमकले



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तिवसा**

लातूर जिल्ह्यातील शेवाळ येथे नुकत्याच आयोजित राज्यस्तरीय भजन स्पर्धेत अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळ, श्रीक्षेत्र गुरुकुंज आश्रम अंतर्गत श्रीगुरुदेव मानवसेवा छात्रालयद्वारा प्रस्तुत स्वरगुरूकुंज भजन मंडळ यांनी उल्लेखनीय कामगिरी करत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. राज्यभरातून ७५ भजन मंडळांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. स्पर्धेचे परीक्षण सुप्रसिद्ध गायक नागेश अडगावकर, राहुल खरे आणि जगदीश चव्हाण यांनी केले. आयोजक मंडळींचे परिश्रम, गावकरी मंडळींचा उत्स्फूर्त प्रतिसाद आणि सहभागी स्पर्धकांचे अप्रतिम सादरीकरण यामुळे स्पर्धेला यश आले. स्वरगुरूकुंज भजन मंडळाच्या सादरीकरणात अनुराग बाभुळकर यांनी मुख्य गायकाची भूमिका निभावली, तर सहगायक म्हणून श्रावण सोनटके, चेतन अंभोरे, नकुल मोरे व सहकाऱ्यांनी उत्तम साथ दिली. वाद्यसंगतीत तबल्यावर विपुल ढोले, पखवाज प्रेम पडघाम, हार्मोनियम सागर भालचक्र यांनी उत्कृष्ट योगदान दिले. संपूर्ण मंडळाचे नेतृत्व अमोल बांबल यांनी केले.

# व्यापाऱ्यांकडून मालाला कवडीमोल भाव शेतकरी धडकले तिवसा तहसीलवर



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५तिवसा**

राज्यात तूर, कापूस, सोयाबीन या पिकाला भाव नसल्याने शेतकर्यांना नाईलाजाने अगदी कमी भावात आपला माल व्यापार्यांना विकावा लागत आहे. त्यामुळे पिकाला हमीभाव तसेच खरेदीला मुदतवाढ व फळबाग शेतकर्यांना नुकसान भरपाई देण्याच्या मागणीसाठी शुक्रवार, १४ फेब्रुवारी रोजी तिवसा तालुका कॉंग्रेसच्या वतीने तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. यावेळी महायुती सरकार विरोधात घोषणा देत शेतकर्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन तहसीलदारांना दिले.

सोयाबीन, कापूस, तुरीचे दर कोसळल्याने शेतकर्यांना दर वाढण्याची आशा लागून आहे. त्यातच नाफेड मार्फत होणारी सोयाबीन, तूर खरेदी बंद पडल्यामुळे शेतकर्यांची मोठी कोंडी झाली आहे. बाजार समितीमध्ये सोयाबीन, कापूस, तूर हे पीक पडून असून आता व्यापारी आपल्याच मार्जीने कवडीमोल भावाने खरेदी करीत आहे. त्यामुळे शेतकर्यांची आर्थिक लूट सुरू असल्यामुळे सरकारने तातडीने शासकीय खरेदी चालू करावी, केंद्र शासनाने सीसीआयचे खरेदी केंद्र सुरू करावे, जे शेतकरी हमीभावाने शेतमाल विकू शकलेले नाहीत त्यांना सरकारने थेट मदत करावी, शेतकर्यांचा सर्व माल हा हमीभावाने खेरदी करावा, संत्रा, मोसंबी उत्पादक शेतकर्यांना नुकसान भरपाई द्यावी, मागण्या यावेळी शेतकर्यांनी रेटून धरल्या. माजी आमदार यशोमती ठाकूर यांच्या मार्गदर्शनात हे आंदोलन करण्यात आले. यावेळी युवक कॉंग्रेसचे कार्यकर्ते व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांसह हमाल-मापारी त्रस्तअचलपूर येथील बाजार समितीत दुर्गंधीयुक्त पाणी, आरोग्यासाठी ठरताहेत घातक




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५परतवाडा**

अचलपूर कृषी उत्पन्न बाजार समिती परिसरात आरोग्यास अपायकारक दुर्गंधीयुक्त पाणी पुरविले गेल्यामुळे शेतकऱ्यांसह हमाल-मापारी यांच्या प्रकृतीस धोका निर्माण झाला आहे काही पोटदुखीने त्रस्त झाले आहेत. परिसरातील विहिरीत सांडपाणी गोळा झाले आहे. पत्रावळ्या, फुलांचे हार, उरलेले फेकलेले अन्न, कुजलेला कचरा यासह अन्य घटक त्या विहिरीत आढळलेत. याच विहिरीपासून काही अंतरावर लागूनच बोअरवेल आहे. या बोअरवेलमधून सध्या पाणीपुरवठा केला जात आहे. पण, या बोअरवेललगतही कचरा, सांडपाणी गोळा असून नाल्या तुंबल्या आहेत. सर्वत्र स्वच्छतेचा अभाव परिसरात दुर्गंधी पसरली आहे.

**समस्या दुर्लक्षित**

शेतकरी हमाल व मापारी यांनी एकत्रित येऊन बाजार समिती प्रशासनासमोर आपली समस्या मांडली. यानंतरही त्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले गेले. अखेर दुर्गंधीयुक्त पाण्याची ओरड होताच पाण्याची टाकी बाजार समिती प्रशासनाने स्वच्छ केली.अशाप्रकारे बोरवेल गत असलेल्या नाल्या तंबून भरल्या आहेत.

दुर्गधी नेमकी कशामुळे, हे कळू शकले नाही. पाणीपुरवठ याची पाइपलाइन व टाकी स्वच्छ करून. ब्लिचिंग पावडरही टाकले आहे. शेतकरी, हमाल-मापारींसह सर्वांनाच शुद्ध, स्वच्छ व पिण्यास योग्य असे पाणी पुरविण्यास बाजार समिती कटिबद्ध आहे.

**योगेश चव्हाण,**
**सचिव, बाजार समिती.**

# मुख्यालयासह १४ पंचायत समित्यांमध्ये दर शुक्रवारी श्रमदान; १०० दिवसीय कृती आराखडा अंमलबजावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

जिल्ह्यात स्वच्छ मिशन अंतर्गत गाव स्मार्ट केली जात असतानाच जेथून या मिशनची अंमलबजावणी होते, त्या जिल्हा परिषदेचे सर्व विभाग आणि संलग्न सर्व कार्यालये स्वच्छ आणि नीटनेटके असणे गरजेचे आहे. त्यामुळे मुख्यालयातील १२ विभागांसह १४ शहरातील पंचायत समिती कार्यालयात यापुढे दर शुक्रवारी श्रमदान करण्यात येणार आहे. या अभियानाचा शुभारंभ शुक्रवारी सायंकाळी केला.

जि. प. सीईओ संजिता महापात्र यांनी हा निर्णय घेतला आहे. या अभियानांतर्गत शुक्रवारी कार्यालयीन कामकाज आटोपल्यानंतर बहुतांश कर्मचाऱ्यांनी आपापला कक्ष, दालनातील कागदपत्रे आणि परिसराच्या स्वच्छतेला सुरुवात केली. सायंकाळच्या वेळी सर्वांनी एकत्र येत डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहासमोरील बगिच्याचा परिसरही स्वच्छ



केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १०० दिवसीय कृती आराखडा अंमलबजावणी कार्यक्रम घोषित केला आहे.

या अनुषंगाने १ जानेवारी ते १० एप्रिल या कालावधीत ही अंमलबजावणी सर्वच शासकीय कार्यालयांत होत आहे. त्याचाच एक भाग म्हणून सीईओ संजीता महापात्र यांनी सर्व संलग्न कार्यालये नियमित स्वच्छ राहील याची काळजी घेण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यासाठी त्यांनी स्वच्छतेचे वेळापत्रकही ठरवून दिले आहे. त्यामुळे यापुढे प्रत्येक शुक्रवारी अधिनस्थ कार्यालयांची अंतर्गत स्वच्छता केली जाईल. याशिवाय कार्यालयातील दस्तावेजांचे वर्गीकरण करून त्याची प्रचलीत पद्धतीनुसार रंगवार वर्गवारी करून बस्ते तयार करणे व त्यास सुव्यवस्थित ठेवणे, कार्यालयातील महापुरुषांच्या प्रतिमांची स्वच्छता करणे आदी कामेही केली जातील. सीईओंनी दिलेल्या निर्देशानुसार प्लास्टिक बंदी व दंड, कार्यालय परिसरात धूम्रपान करण्यास मनाई व दंड, थुंकण्यास मनाई व दंड आदीचे फलकही लावण्यात येतील. एकंदरीत अधिनस्थ कार्यालय नीटनेटके, स्वच्छ व सुंदर असणे आवश्यक आहे. याकरिता आपण आपल्या स्तरावर कल्पकता वापरून कार्यालयाची सजावट करणे, अशा सूचनाही सीईओंनी पत्राद्वारे सर्व खातेप्रमुख व गटविकास अधिकारी यांना दिल्या आहेत.

# वक्फ बोर्ड बंद करून सनातनी बोर्ड स्थापन करा : नवनीत राणा

## पंतप्रधान मोदी, गृहमंत्री अमित शहांकडे करणार मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

भाजप नेत्या नवनीत राणा यांनी वक्फ बोर्ड बंद करून त्याच्या जागी सनातनी बोर्ड स्थापन करण्याची मागणी करून एकच खळबळ उडवून दिली आहे. राणा यांनी या प्रकरणी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे मागणी करण्याचे सूतोवाच केले आहे. त्यामुळे या प्रकरणी मोठे राजकारण रंगण्याची चिन्हे आहेत.

राज्यात लव्ह जिहाद, फसवणूक व जबरी धर्मांतर रोखण्यासाठी एक कायदा करण्यात येणार आहे. यासाठी सरकारने पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वात एक विशेष समिती नियुक्त केली आहे. ही समिती राज्यातील स्थितीचा अभ्यास करून त्यावर विविध उपाययोजना सूचवून कायद्याचा मसुदा तयार करणार आहे. या पार्श्वभूमीवर माजी खासदार नवनीत राणा यांनी शनिवारी लव्ह जिहादविरोधी कायद्यावर भाष्य करत उपरोक्त मागणी केली आहे.

**राज्यात लव्ह जिहाद वाढला**

नवनीत राणा म्हणाल्या, राज्यात लव्ह जिहाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे या कायद्याचा खूप मोठा फायदा होईल. या प्रकरणी आजवर अनेक समित्या काम करत होत्या. या प्रकरणी अडचणीत सापडलेल्या अनेक मुलींना आम्ही परत आणले आहे. महाविकास आघाडीच्या काळात आरोपींना सहकार्य मिळत होते. त्यामुळे यासंबंधीचा कायदा आला तर मुलींची कोणतीही फसवणूक होणार नाही.

**वक्फ बोर्ड रद्द करून सनातनी बोर्ड स्थापन करा**

नवनीत राणा यांनी यावेळी वक्फ बोर्ड रद्द करून त्याच्या जागी सनातनी बोर्ड स्थापन करण्याचीही मागणी केली. वक्फ बोर्डाने कोट्यवधी जमिनी



लाटल्या आहेत. त्यामुळे वक्फ बोर्ड रद्द करून त्याच्या जागी सनातनी बोर्ड स्थापन केला जावा. हा बोर्ड भाजपचे सरकार अस्तित्वात असतानाच झाला पाहिजे. मी स्वतः या प्रकरणी पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेणार आहे, असे राणा म्हणाल्या.

उल्लेखनीय बाब म्हणजे देशात आतापर्यंत उत्तर प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, गुजरात, झारखंड, मध्य प्रदेश, उत्तराखंड, ओडिशा व छत्तीसगड या ९ राज्यांत लव्ह जिहाद विरोधी कायदा अस्तित्वात आहे. त्यामुळे असा एखादा कायदा झाला तर महाराष्ट्र त्याबाबतीत दहाव्या क्रमांकाचे राज्य ठरेल. भाजप नेते तथा मंत्री नीतेश राणे यांच्यासह राज्यातील विविध हिंदुत्ववादी संघटनांनी यापूर्वीच अशी मागणी केली आहे.

**कोण – कोण असणार समितीत?**


लव्ह जिहाद विरोधी सरकारने स्थापन केलेल्या पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वातील समितीत महिला व बाल कल्याण विभागाचे सचिव, अल्पसंख्याक विकास विभागाचे सचिव, विधी व न्याय विभागाचे सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सचिव, गृह विभागाचे सचिव तसेच गृह खात्याचे विधि सचिव यांचा समावेश असेल. राज्यातील स्थितीचा अभ्यास करून ही समिती इतर राज्यांतील कायद्याचा अभ्यास करून लव्ह जिहाद व जबरी धर्मांतरावर विविध उपाययोजना सूचवणार आहे. या समितीवर प्रस्तुत कायद्याचा मसुदा तयार करण्याचेही काम सोपवण्यात आले आहे.

**भाजप खासदाराने केले स्वागत**

भाजप खासदार अनिल बोंडे यांनी राज्य सरकारच्या समिती स्थापन करण्याच्या निर्णयाचे स्वागत केले आहे. लव्ह जिहादविरोधी कायद्यासाठी पोलिस महासंचालकांच्या नेतृत्वात समिती स्थापन करण्याचा निर्णय स्वागतारार्ह आहे. राज्यात लव्ह जिहाद फोफावला आहे. विविध शाळा व महाविद्यालयांत अशा घटना घडत आहेत. त्याला आळा बसण्याची गरज आहे. मी स्वतः या समितीला काही सूचना पाठवेल. लव्ह जिहादमुळे अनेक मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त झाले. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. सरकारने लव्ह जिहाद सारखा लँड जिहाद विरोधी कायदाही आणला पाहिजे, असे ते म्हणाले.

# 'समृद्धी'वरून प्रवास करणाऱ्यांसाठी ३० ठिकाणी प्रवाशांच्या सोयीसाठी केंद्रे उभारणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५नागपूर**



समृद्धी महामार्गावर वाहनचालकांच्या सोयीसाठी स्वच्छतागृह, इंधन केंद्र, वाहन दुरुस्ती केंद्र, उपाहारगृह यांसारख्या मूलभूत सुविधांनी सज्ज एकूण ३० केंद्रे उभारण्यात येणार आहेत. या केंद्रांची निर्मिती जलदगतीने करण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरण प्रतिबद्ध आहे, अशी हमी महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी उच्च न्यायालयात दिली.

समृद्धी महामार्गावर होणाऱ्या अपघातांबाबत सामाजिक कार्यकर्ते अनिल वडपल्लीवार यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेवर न्या.नितीन सांबरे आणि न्या.वृषाली जोशी यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान महाराष्ट्र रस्ते विकास प्राधिकरणाने न्यायालयात शपथपत्र दाखल करत महामार्गावरील प्रस्तावित सुविधांबाबत माहिती सादर केली. यावेळी महाधिवक्ता बिरेंद्र सराफ यांनी स्वत: प्राधिकरणाच्यावतीने बाजू मांडली. महामार्गावर प्रस्तावित ३० केंद्रांपैकी १६ केंद्रांवर सर्व सुविधा उपलब्ध राहतील. ८ केंद्रावर केवळ इंधनाची सुविधा आणि स्वच्छतागृह राहतील. सहा केंद्र भाडेतत्त्वावर विकसित केले जातील. संपूर्ण महामार्गावर तयार आणि प्रस्तावित केंद्रावर स्वच्छता ठेवण्यासाठी विशेष उपाययोजना केली जाणार असल्याचे ॲड. सराफ यांनी सांगितले. सुनावणीदरम्यान, न्यायालयाने महामार्गावरील पेट्रोल पंपावरील स्वच्छतागृहांच्या दुरवस्थेवर चिंता व्यक्त केली आणि तिन्ही इंधन पुरवठा कंपन्याना याबाबत सविस्तर जबाब नोंदवण्याचे आदेश दिले. याचिकेवर पुढील सुनावणी ११ मार्च रोजी होणार आहे.

**एकदा 'समृद्धी'ने नागपूरला या**

न्यायालयात सुनावणीदरम्यान महाधिवक्ता यांनी शासनाची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. यावर न्यायालयाने त्यांना प्रतिप्रश्न केला की, तुम्ही कधी समृद्धीने प्रवास केला आहे काय? महाधिवक्ता सराफ यांनी नकार दिला. यावर, कधी नागपूरला समृद्धी महामार्गाने प्रवास करत या, असा सल्ला न्यायालयाने महाधिवक्त्यांना दिला. मागील सुनावणीत सरकारी वकील शासनाची समाधानकारक बाजू मांडण्यात अपयशी ठरल्यामुळे न्यायालयाने वकिलांना फटकारत महाधिवक्ता यांना उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते.

**महामार्ग ओसाड**

समृद्धी महामार्गावर वृक्षारोपण न केल्यामुळे संपूर्ण महामार्ग ओसाड झाला आहे. याबाबत उच्च न्यायालयाने चिंता व्यक्त केली. महामार्गावर वृक्षारोपण करण्याबाबत प्राधिकरण काय पावले उचलत आहे याविषयी माहिती सादर करण्याची सूचना केली. दुसरीकडेस, महामार्गावर वाहतूक अधिकारी उपस्थित राहत नसल्याचा तसेच नियमित तपासणी होत नसल्याचा दावा याचिकाकर्त्याने केला होता. वाहतूक विभागाने हा दावा फेटाळत विविध ठिकाणी अधिकारी उपस्थित राहत असल्याबाबत लिखित माहिती सादर केली.

# उन्हाळ्यातील सकाळ पाळीतील शाळेच्या वेळेत बदल करा

## शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.अमरावती यांना महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती जि.अमरावती चे निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

उन्हाळ्यातील सकाळ पाळीतील शाळेच्या वेळेत बदल करा असे निवेदनराज्य प्राथमिक शिक्षक समिती जि.अमरावती च्या वतीने डॉ.अरविंदजी मोहरे शिक्षणाधिकारी, प्राथमिक, जि.प.अमरावती यांना निवेदन सादर करण्यात आले.यावेळी यावर विचार करू असे आश्वासन यावेळी देण्यात आले. दि.२० मार्च २०२५ पासून जि.प.अमरावती अंतर्गत शाळा ह्या सकाळ पाळीत सुरू होणार आहेत.सद्या सकाळ शाळेची वेळ ही सकाळी ९:०० ते १२:३० अशी आहे.आता उन्हाळा सुरू झाला आहे, अमरावती मध्ये उष्णतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे,त्यामुळे उष्णतेचे प्रमाण लक्षात घेता, दि.२० मार्च २०२५ पासून सुरू होणाऱ्या सकाळ पाळीमधिल शाळेच्या वेळात बदल करून ती सकाळी ७:०० ते ११:५० अशी करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. शिक्षणाधिकारी साहेब (प्राथमिक) यांनी आपली मागणी सहानुभूती पूर्वक ऐकून घेवून, लवकरच सकाळ शाळेच्या वेळा संबंधाने सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वस्त केले.निवेदन देतेवेळी संभाजी रेवाळे सर (मार्गदर्शक,महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, अमरावती),उमेशभाऊ चुनकीकर सर (तालुकाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती, भातकुली),प्रफुलजी वाठ सर (माजी तालुका सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती भातकुली) व शैलेंद्र स.दहातोंडे (जिल्हा सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती,अमरावती) उपस्थित होते.असे शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.

# तेलाच्या दरवाढीने बिघडले गणित ! लग्न सराईत पुन्हा दरवाढ होण्याचा व्यापाऱ्यांचा अंदाज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

जिल्ह्यात लग्न सराईच्या तोंडावर खाद्यतेल आणि साखरेच्या दरात भाववाढ कायम आहे. विशेष म्हणजे, गत महिन्याभराप्रमाणे साखरेची दरवाढ कायम आहे. क्विंटलमागे ९० रुपयांनी वाढ झाली बआहे. महागाईवर दिलासा मिळण्याची गरज यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

साखरे उत्पादनातील घट, अपुरा कोटा व वाढती मागणी यामुळे दरवाढ होत आहे.



स्थानिक बाजारात सध्या मागणी कमी असली तरी अन्य राज्यांकडून मागणी वाढली असल्याने दर वाढत असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. उन्हाळ्यात थंडगार पेय आणि आइस्क्रीमसाठी तसेच लग्न सराईमुळे साखरेची मागणी वाढत असते. त्यामुळे दरांत आणखी वाढ होण्याची शक्यता आहे. सध्या घाऊक बाजारात साखरला प्रती क्विंटलचा ४ हजार १०० ते ४ हजार १५० रुपयांचा दर आहे. जागतिक बाजारात तेलाचे वाढलेले दर आणि डॉलरच्या तुलनेत रुपयाचे झालेले अवमूल्यन यामुळे खाद्यतेलाचे दर वाढले आहेत.

**किती ही महागाई?**

जिल्ह्यात जीवनावश्यक वस्तूंच्या दरात सातत्याने वाढ होत आहे. ही वाढ कोरोना काळापासून सुरूच आहे. महागाई केव्हा कमी होणार, असा सवाल आहे. खाद्यतेलात ५ रुपये प्रति लिटर दरवाढ तर साखरेत २ रुपयांची दरवाढ झालेली आहे.

**महिलांचे बजेट कोलमडले**

जिल्ह्यात कोरोनापासून सातत्याने महागाई वाढत आहे. जीवनावश्यक वस्तूंच्या दरात वाढ होत असल्याने महिलांचे आर्थिक बजेट बिघडलेले आहे.

# जिल्ह्यातील ग्रामीण भागात आहेत ७८ हजारांवर लखपती दीदी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

महिला सशक्तीकरणावर सरकारचा विशेष भर आहे. महिलांची आर्थिक, सामाजिक प्रगती व्हावी, याकरिता सरकारकडून प्रयत्न केले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून सरकारकडून 'लखपती दीदी' ही योजना राबवली जात आहे. आतापर्यंत जिल्ह्यातील २२ हजार २३४ महिला बचत गटांच्या माध्यमातून उमेद अभियानांतर्गत यंदा जिल्ह्यासाठी ८३ हजार २७२ एवढे उद्दिष्ट शासनाकडून दिले होते. त्यापैकी आतापर्यंत ७८ हजार ७११ महिला लखपती झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. बचत गटांसोबत काम करणाऱ्या महिलांना लखपती दीदी योजनेचा लाभ घेता येणार आहे.

जिल्ह्याला ८३ हजार २७१ उद्दिष्ट आहे. त्यापैकी आजघडीला



ग्रामीण भागात सुमारे ७८७११ लखपती दीदी आहेत. उमेद अभियानांतर्गत महिला बचत गटांना व्यवसायांकरिता विविध बँकांच्या माध्यमातून आतापर्यंत २२२३४ महिला बचत गटांना ३२२ कोटी २६ लाख २१ हजार रुपयांचे कर्जवाटप केले आहे.

जिल्ह्यात २२२३४ इतकी बचत गटांची संख्या आहे. या बचत गटांच्या माध्यमातून लाखो महिलांना एकत्र आणण्याचे काम जिल्हा परिषदेच्या उमेद अभियानाने यशस्वीपणे केले आहे.

# एसटी कर्मचाऱ्यांना कुटुंबासह फिरता येणार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

नववर्षामध्ये राज्य परिवहन महामंडळाकडून दोन महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत. यातील एक बदल म्हणजे प्रवासी दरात केलेली घसघशीत अशी १५ टक्के वाढ आणि दुसरा बदल म्हणजे एसटी महामंडळातील चालक वाहकाच्या कुटुंबीयांना वर्षातील चार महिने मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.




प्रवासी वाहतुकीसाठी नागरिक प्राधान्याने एसटी महामंडळाच्या बसला पसंती देतात. बसमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना त्यांच्या सुरक्षितपणे चालक व वाहक अखंडपणे प्रयत्न करीत असतात. जेव्हा हे कर्मचारी त्यांच्या कुटुंबासह प्रवासासाठी निघतात, तेव्हा त्यांना पूर्वी कर्तव्यावर असलेल्यांना दोन महिन्यांचा व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सहा महिन्यांचा मोफत पास मिळत होता. आता महामंडळाने त्यामध्ये दुरुस्ती करीत सेवेतील कर्मचाऱ्यांना चार महिने, तर माजी कर्मचाऱ्याऱ्यांना नऊ महिन्यांचा मोफत पास देण्याचे धोरण अवलंबले आहे.

**आता वर्षभरात ४ महिने मोफत फॅमिली पास**

पहिले सत्र जानेवारी ते जून या कालावधीत एक महिन्याचा पास आणि दुसरे सत्र जुलै ते डिसेंबरमध्ये एक महिन्याचा असा एकूण दोन महिन्यांचा मोफत पास देण्यात येत असे. मात्र, आता एका सत्रात दोन महिने, असे दोन सत्रांमध्ये मिळून चार महिन्यांचा मोफत पास दिला जाणार आहे.

**आता वर्षभरात ४ महिने मोफत फॅमिली पास**

पहिले सत्र जानेवारी ते जून या कालावधीत एक महिन्याचा पास आणि दुसरे सत्र जुलै ते डिसेंबरमध्ये एक महिन्याचा असा एकूण दोन महिन्यांचा मोफत पास देण्यात येत असे. मात्र, आता एका सत्रात दोन महिने, असे दोन सत्रांमध्ये मिळून चार महिन्यांचा मोफत पास दिला जाणार आहे.

**दोन सत्रांसाठी मिळतो फॅमिली पास**

एसटी विभागाकडून आधी जानेवारी ते जून व जुलै ते डिसेंबर या दोन सत्रात दोन महिन्यांचा मोफत पास पास देण्यात येत असे. मात्र, आता या सुविधेत मोठी सुधारणा करत एका सत्रात दोन महिने असे दोन सभांमधील मिळून चार महिन्यांचा मोफत पास दिला जाणार आहे.

# रस्ता अपघात टाळण्यासाठी बंडी ला रेडियम लावा; पक्षीमित्र अरुण शेवाणे यांचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५कापूसतळणी**

महामार्ग आणि रस्त्यांच्या गुंतागुंतीच्या व्यवस्थेचा विचार करताना वाहनांची सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता म्हणून समोर येते. वाहनाच्या सामान्य सुरक्षेत योगदान देणाऱ्या घटकांपैकी मागील दिव्यांचे ( टेल लाईट) महत्व अनेकदा कमी लेखले जाते परंतु ते खूप महत्त्वाचे आहे.



रात्रीच्या वेळी किंवा कमी प्रकाशाच्या परिस्थितीत इतर चालकांना व रस्त्यावरील वापरकर्त्यांना ते दृश्यमान होते. संपूर्ण रस्ता सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी महत्त्वपूर्ण टेल लाइट्स ठरते.टेल लाइट्स हे वाहनाचे केवळ सजावटीचे आकर्षण नसून ते जागरूकता, संवाद आणि रस्त्यावरील एकूण सुरक्षितता सुधारण्यात देखील महत्त्वाचे काम करतात. अंजनगाव सुर्जी तालुक्यातील कापुसतळणी येथील सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेल्या पक्षीमित्र अरुण शेवाणे यांनी रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून आणि अपघात टळण्याच्या दृष्टिकोनातून वाहनाच्या मागील टेल लाइट्सची भूमिका प्रत्यक्ष कृतीतून पटवून देऊन टेल लाइट्सची सुविधा नसलेल्या बैलबंडी ला लाल रेडियम लावून वनोजा बाग या गावातून आपल्या अभियानात सुरुवात केली आहे. या अभियानास गावातीलच सहकारी मित्र चेतन बाबनेकर, प्रशांत सरदार,सुरेश महानकर, प्रदीप सातवटे,श्याम बाबनेकर आदींचा सहभाग लाभला. रस्ता सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून टेल लाइट्स नसलेल्या वाहनाला व बैलबंडीला रेडियम लावून रस्ता सुरक्षिततेसाठी हातभार लावला अशे आवाहन पक्षीमित्र अरुण शेवाणे यांनी केले आहे. या उपक्रमाबद्दल पंचक्रोशीत त्यांचे कौतुक होत आहे.

# कागदपत्रे सादर न केल्यास निराधारांचे अनुदान होणार बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५अमरावती**

संजय गांधी योजना, श्रावणबाळ योजना विभागांतर्गत निराधारांना लाभ दिला जातो. सदर योजनेंतर्गत डिसेंबर २०२४ व जानेवारी २०२५ चे अनुदान डीबीटीद्वारे दिले जाणार आहे. कागदपत्रे सादर न केल्यास अनुदान बंद केले जाणार आहे.



निराधार योजनेचा लाभ घेणाऱ्या ज्या लाभार्थ्यांनी अद्यापही आपले आधार कार्ड, मोबाइल क्रमांक, बँक खाते, पासबुक तसेच लाभार्थी विधवा किंवा दिव्यांग असेल तर पतीचे मृत्यू प्रमाणपत्र किंवा दिव्यांगाचे प्रमाणपत्रासह संबंधित ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे जमा करणे आवश्यक आहे. सदर कागदपत्रे जमा न केल्यास लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहू शकतात. शासनाने डीबीटी अंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात अनुदान जमा करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे वेळेत सादर करावे लागणार आहे.

**लाभार्थ्यांचे आधार अपडेट आवश्यक**

लाभार्थ्यांचे आधार कार्ड अपडेट असणे आवश्यक आहे. आधार व्हॅलिटेड नसल्यास लाभार्थ्यांची डीबीटी पोर्टलवर नोंदणी होणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ज्या लाभार्थ्यांनी वेळेत कागदपत्रे सादर केली नाही, अशा लाभार्थ्यांचे अनुदान कागदपत्रांअभावी फेब्रुवारी २०२५ अखेर पासून बंद होणार आहे.